# ‘दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासन प्रयत्नशील’



**मुंबई :** दुष्काळग्रस्त भागांतील पंचनामे सुरू असून अहवाल प्राप्त होताच मदतीचे निकष, पीक विमा योजना तसेच राज्य शासनाची मदत यांचा समन्वय साधून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी शासन प्रयत्न करेल, असे दुष्काळासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.६) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी उपाययोजना, उपलब्ध पाणीसाठा आणि पीक–पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत शेतकरी व शेतमजुरांना केंद्रस्थानी ठेवून विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. केंद्रीय दुष्काळ पाहणी पथक राज्यात येत असून त्यांच्या भेटीची ठिकाणे निश्चित करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. **(सविस्तर पान २ वर..)**

रायगड, नवी मुंबई



# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ८०
www.ramprahar.com

◆ बुधवार, ७ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

दिवाळी अंकांतून साहित्य क्षेत्राला नवी उंची -ना. आशिष शेलार/३
एपीएमसीच्या अधिकाऱ्याला लाच घेताना अटक/६
माणगाव पोलिसांची जुगार अड्ड्यांवर पुन्हा कारवाई/७



# 'दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासन प्रयत्नशील'

**मुंबई : प्रतिनिधी**

दुष्काळग्रस्त भागातील पंचनामे सुरू असून अहवाल प्राप्त होताच मदतीचे निकष, पीक विमा योजना तसेच राज्य शासनाची मदत यांचा समन्वय साधून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी शासन प्रयत्न करेल, असे दुष्काळासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. केंद्रीय दुष्काळ पाहणी पथक राज्यात येत असून त्यांच्या भेटीची ठिकाणे निश्चित करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी उपाययोजना, उपलब्ध पाणीसाठा आणि पीक-पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत शेतकरी व शेतमजुरांना केंद्रस्थानी ठेवून विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. यावेळी समिती सदस्य मंत्री पंकजा मुंडे, दत्तात्रय भरणे, मकरंद पाटील, नितेश राणे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, जयकुमार गोरे, प्रताप सरनाईक, गिरीष महाजन, बाबासाहेब पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागांचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, राष्ट्रीयकृत आणि खासगी बँका तसेच खासगी वित्त संस्थांनी या काळात कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना दूरध्वनी करू नयेत. शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या बँकांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येतील. मुख्य सचिवांनी रिझर्व बँकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्या माध्यमातून बँकांसाठी सूचना द्याव्यात. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बँकांच्या जिल्हास्तरीय बैठका घ्याव्यात.

ई-केवायसी पूर्ण न झाल्यामुळे प्रलंबित असलेले पीक कर्ज तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण केली जाणार आहे. ॲग्रीस्टॅकवर नोंद नसलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी करून त्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात यावा. डिजिटल पीक सर्वेक्षणातील ऑनलाइन अडचणी दूर करण्याची कार्यवाहीही सुरू करण्यात यावी. बंद पडलेल्या पिण्याच्या पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू करण्यासह जमिनीत मोठ्या प्रमाणावर पाणी पुनर्भरण करण्यासाठी रिचार्ज शाफ्ट योजना राबविण्यावर या बैठकीत चर्चा झाली. बांधकामांसाठी पिण्याचे शुद्ध पाणी न वापरता सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून शुद्ध केलेले पाणी वापरणे आवश्यक राहणार असून याबाबत शासन निर्णय जारी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

जलसंपदा विभागाने उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून त्याचे नियोजन करण्यासाठी शासन निर्णय जारी केला आहे. प्रत्येक जिल्ह्यातील परिस्थिती वेगळी असल्यामुळे पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पाणीवापर संनियंत्रण समिती स्थापन करावी, याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

राज्यात चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यासाठी वन विभागाच्या मोकळ्या जमिनी, तलाव परिसर आणि जलसंपदा विभागाच्या तलावांलगतच्या शासकीय जमिनींवर गवताळ क्षेत्र विकसित करून चारा बँका उभारण्यात याव्यात. विदर्भासह भात उत्पादक भागातील भाताची पेंढी जाळण्याऐवजी साठवून तिचा चाऱ्यासाठी उपयोग केला जावा. इतर राज्यांतून चारा आणण्यापेक्षा राज्यातील उपलब्ध स्रोतांमधून जास्तीत जास्त चारा निर्माण करण्यावर भर राहणार असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यात दुष्काळ निवारणासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. पाणी असलेल्या ठिकाणी चारा बँक करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील विविध कंपन्यांची सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून मदत घेतली जाणार आहे. सर्व तालुक्यांना समान न्याय देण्यासाठी जास्तीत जास्त कंपन्यांनी सीएसआरसाठी मदत करण्याचे आवाहन मंत्री बावनकुळे यांनी केले.

# रेवदंडा-साळाव खाडी पूल प्रकल्पाला वेग

## पाइल, पिलर उभारणीचे काम युद्धपातळीवर

**रेवदंडा : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील रेवदंडा ते साळाव दरम्यान कुंडलिका खाडीवर उभारण्यात येत असलेल्या बहुचर्चित खाडी पुलाच्या कामाला आता वेग आला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (MSRDC) माध्यमातून साकारण्यात येणारा हा पूल रेवासरेड्डी कोस्टल हायवे (MSH-४) मधील महत्त्वाचा दुवा ठरणार असून, कोकण किनारपट्टीवरील वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान आणि सुरक्षित करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे.

सध्या कुंडलिका खाडीपात्रात पाइल फाउंडेशन तसेच पिलर उभारणीची कामे युद्धपातळीवर सुरू असून, अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने बांधकाम करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या कामाला मिळालेली गती पाहता स्थानिक नागरिकांसह पर्यटकांचेही या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाकडे लक्ष लागले आहे.

सुमारे ३.८२९ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात जोडरस्त्यांसह चार मार्गिकांचा आधुनिक पूल उभारण्यात येणार आहे. ताशी ८० किलोमीटर वेगाने वाहतूक सुरळीत पार पडेल, अशा मानकांनुसार पुलाची रचना करण्यात येत आहे. पुलावर आकर्षक विद्युत रोषणाई, पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र फूटपाथ तसेच युटिलिटी लाईन्सची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नवीन पुलामुळे अलिबाग तालुक्यातील रेवदंडा आणि मुरुड तालुक्यातील साळाव यांच्यात थेट व सक्षम संपर्क निर्माण होणार आहे. त्यामुळे अलिबाग, मुरुड, रोहा आणि श्रीवर्धन परिसरातील प्रवास अधिक जलद व सुरक्षित होण्याची अपेक्षा आहे. मुंबई आणि पुणे येथून मुरुड-जंजिरा, काशीद, रेवदंडा समुद्रकिनारा आदी पर्यटनस्थळांकडे येणाऱ्या पर्यटकांच्या प्रवासाचा वेळही कमी होण्यास मदत होणार आहे.

सुमारे ५२३ किलोमीटर लांबीच्या आणि अंदाजे २६ हजार कोटी रुपयांच्या रेवासरेड्डी कोस्टल हायवे प्रकल्पात नऊ मोठ्या खाडी पुलांचा समावेश आहे. धरमतर, आगरदांडा, बाणकोट, दाभोळ, जयगड, केळशी आणि काळबादेवी यांसह रेवदंडासाळाव खाडी पुलाला या संपूर्ण मार्गिकेत विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या पुलाचे बांधकाम अशोक बिल्डकॉन लिमिटेड या पायाभूत सुविधा कंपनीकडून करण्यात येत असून, सध्या प्रत्यक्ष कामाने चांगली गती घेतली आहे.

# राजेश गायकर भाजप खालापूर पश्चिम मंडळ संपर्कप्रमुखपदी

**पनवेल: वार्ताहर :**

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक रचनेअंतर्गत राजेश गायकर यांची खालापूर पश्चिम नवीन मंडळाच्या संपर्कप्रमुख पदी अधिकृत नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि ध्येयधोरणे तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. राजेश गायकर यांना पक्ष संघटनेचा दीर्घ अनुभव असून त्यांनी यापूर्वी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्षपदी सलग सहा वर्षे यशस्वीपणे काम पाहिले आहे.



यासोबतच त्यांनी संपर्कप्रमुख म्हणून खालापूर, खारघर, कर्जत आणि पनवेल (दक्षिण) अशा विविध तालुक्यात संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडल्या आहेत. त्यांच्या या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा खालापूर पश्चिम मंडळात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी निश्चितच होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या नव्या नियुक्तीबद्दल राजेश गायकर यांच्यावर राजकीय, सामाजिक आणि विविध स्तरातून अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे असून त्यांनी या नियुक्तीबाबत आ. प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेलचे महापौर तथा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांचे आभार मानले आहेत.

# श्रीवर्धन शहरात व्हेल माशाची उलटी जप्त

■ तीन आरोपी अटकेत

**श्रीवर्धन : बातमीदार**

सोमवार (दि. ५) रोजी श्रीवर्धन येथील जीवनापार नाका परिसरामध्ये दोन तरुण आपल्या दुचाकीवरून पिशवीमध्ये काहीतरी संशयास्पद वस्तू घेऊन जात असल्याचे पोलिसांना दिसले. सदर पिशवीची झडती घेतली असता, या पिशवीमध्ये पोलिसांना व्हेल माशाची उलटी आढळून आली. हे तरुण व्हेल माशाची उलटी विक्रीसाठी नेत असल्याचे निष्पन्न झाले. तरुणांची चौकशी केल्यानंतर यामध्ये अजून एक आरोपी पोलिसांना आढळून आला. या तीनही जणांना श्रीवर्धन पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले. या उलटीची आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये प्रति किलो एक कोटी रुपये एवढी किंमत आहे.



सदरची उलटी ही अंदाजे सहाशे ग्रॅम वजनाची असून, अंदाजे ६१ लाख रुपये तिची किंमत आहे. याप्रकरणी श्रीवर्धन पोलिसांनी विराज चौलकर, (२५) ऋतुराज रघुवीर, (१९) रामचंद्र रघुवीर (४८) राहणार सर्व श्रीवर्धन या तीन आरोपींना अटक करून त्यांच्यावरती गुन्हा दाखल केला आहे. न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी दिली असून, सदर प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहे.

# पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत

**धाटाव : प्रतिनिधी**

आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. मागील आठ ते दहा दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतातील पिकांना पाण्याची कमतरता भासू लागली आहे. पावसाचे कोणतेही चिन्ह दिसत नसल्याने आता शेतकऱ्यांच्या तोंडून अक्षरशः "ये रे ये रे पावसा..." असे आर्त स्वर उमटताना दिसत आहेत. ऑक्टोबर हिट सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.



रोहा तालुक्यात यंदा सुमारे ५ हजार हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड करण्यात आली आहे. तसेच १७० हेक्टरवर नाचणी, १५ हेक्टरवर वरी आणि १५ ते २० हेक्टर क्षेत्रावर भाजीपाला लागवड करण्यात आली आहे.सध्या भात पीक महत्त्वाच्या अवस्थेत असून, विशेषतः वरकस भागातील भातशेतीला पाण्याची नितांत गरज आहे. पुढील पाच-सहा दिवसांत पाऊस झाला नाही तर भात पिकाला दाणा भरण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. परिणामी उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

तालुक्यात अनेक शेतकरी भाडेतत्त्वावर शेती घेऊन पिके घेतात. शेतीसाठी लागणारा खर्च, बियाणे, खते, मजुरी आणि इतर खर्च करून पीक उभे केले जाते. मात्र ऐन पिकाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने पाठ फिरवल्याने या शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. पाऊसच झाला नाही आणि पीक हातचे गेले, तर केलेला खर्चही वसूल होणार नाही, अशी भीती शेतकरी व्यक्त करत आहेत."पीक पिकलंच नाही तर खायचं काय?" असा सवाल आता शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसाठी आगामी काही दिवस अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून, पावसाने आणखी दडी मारल्यास परिस्थिती बिकट होण्याची शक्यता आहे.याबाबत तालुका कृषी अधिकारी महादेव अरे यांनी माहिती देताना सांगितले की, तालुक्यात मोठ्या प्रमाणावर भात लागवड झाली असून मागील आठ ते दहा दिवसांपासून पाऊस झालेला नाही.

पुढील पाच-सहा दिवसांत पाऊस न झाल्यास विशेषतः वरकस भागातील भात पिकाला दाणा भरण्यात अडचण येऊ शकतात. त्यामुळे आगामी काळातील पाऊस शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.



**सातारा :** सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान, महाराष्ट्रतर्फे बुधवारी मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिरात प्रतिष्ठेचा शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने सन्मान होणार आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी कॉलेज येथील माजी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुभाष वाघमारे व कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, शंकरराव पायमल व त्यांच्या पत्नी, प्रताप भोसले यांच्यासह कॉलेजचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# कचऱ्यामुळे कलोते-रयती मार्गावर दुर्गंधीचे साम्राज्य

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील मुंबई-पुणे जुन्या महामार्गालगत असलेल्या कलोते-रयती गावाकडे जाणारा रस्ता सध्या कचऱ्याच्या विळख्यात सापडला आहे. रस्त्याच्या दुतर्फा हॉटेल, रिसॉर्ट व इतर आस्थापनांमधील अन्नमिश्रित तसेच कुजलेला कचरा टाकला जात असल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तसेच रयती ग्रामपंचायतीचा टाकाऊ कचरा येथे टाकला जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे.



कलोते-रयती मार्गावरून रयती गावासह विविध आदिवासी पाडे, फार्महाऊस, व्यसनमुक्ती केंद्रे तसेच धार्मिक संस्थांकडे नागरिकांची नियमित ये-जा असते. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने नागरिकांना या मार्गावरून प्रवास करताना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

कुजलेल्या कचऱ्याच्या तीव्र दुर्गंधीमुळे श्वास घेण्यासही त्रास होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही आदिवासी नागरिकांना या मार्गावरून प्रवास करताना त्रास होऊन गुदमरल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याचेही स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. अन्नमिश्रित कुजलेल्या कचऱ्यामुळे भटकी कुत्री, साप तसेच जंगली प्राण्यांचा वावर वाढला असल्याची तक्रार आहे. डोंगरालगत आणि काही प्रमाणात दुर्गम भागातून जाणारा हा रस्ता दिवसा पायी जाणाऱ्या नागरिकांसाठीही असुरक्षित वाटत असून, रात्रीच्या वेळी या मार्गावरून प्रवास करणे अधिक धोकादायक ठरत असल्याची भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

या गंभीर समस्येची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने, संबंधित रस्ते प्राधिकरणाने तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. रस्त्याच्या दुतर्फा कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, नियमित स्वच्छता व्यवस्था करावी आणि कलोते-रयती मार्ग कायमस्वरूपी कचरामुक्त, स्वच्छ व सुरक्षित करावा, अशी कळकळीची मागणी रयतीसह परिसरातील आदिवासी पाड्यांतील नागरिकांनी केली आहे.

> **येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून ट्रान्सफॉर्म लावण्याचे काम सुरू आहे.हा प्रकल्प सुरू होताच या रस्त्यावर कचरा टाकण्याचे बंद होईल.**
>
> **-श्री. म्हस्कर,ग्रामपंचायत अधिकारी, रयती ग्रामपंचायत**

# पडम ग्रामस्थांकडून सेवानिवृत्त जवान रोशन टेमकर यांचे जंगी स्वागत

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पडम गावाचे सुपुत्र भारतीय सैन्य दलातील जवान रोशन तानाजी टेमकर यांनी भारतीय सैन्य दलात १७ वर्ष ३ महीने देश सेवा करुन सेवानिवृत्त झाले. आपल्या मूळ गावी पडम येथे आल्यानंतर पडम ग्रामस्थांनी त्यांचा जंगी स्वागत केले आहे.



पडमचे ग्रामदैवत श्री मरुआई, जाखमाता मंदिर येथुन सेवानिवृत्त भारतीय सैन्य दलातील जवान रोशन तानाजी टेमकर यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.श्री मरुआई, जाखमाता मातेचे दर्शन घेत सजवलेल्या चारचाकी गाडीवर उभे राहतात राष्ट्रीय ध्वज तिरंगा हातात घेत माजी सेवानिवृत्त सैनिक रोशन टेमकर यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळी आई, वडील, भाऊ बहीण व त्यांची पत्नी सोबत होती.

देशभक्तीपर गीतांच्या तालावर ग्रामस्थांनी यावेळी ठेका घेतला. संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाल्याचे दिसुन आले.सुरवातीला आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते सेवानिवृत्त जवान रोशन टेमकर यांचा सत्कार करण्यात आला.

मिरवणुकीचा शेवट पडम गावाच्या चावडीवर करण्यात आले.या ठिकाणी पडम ग्रामस्थांच्यावतीने निवृत्त सैनिक रोशन टेमकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी मित्र परीवार व नातेवाईक यांच्याकडुन ही सत्कार करण्यात आला. प्रसिद्ध कवी शाहीर पुंडलिक ताडकर यांनी आपल्या ओघळत्या वाणीतुन देशभक्तीपर गीते, शेर शायरी सादर केले.

या सत्कार समयी सेवानिवृत्त जवान रोशन टेमकर यांनी आपल्या देशसेवा सुरु करण्यापासून सेवानिवृत्त पर्यंत आई वडीलांचा आशिर्वाद, भाऊजींचे मार्गदर्शन, पत्नीची साथ मिळाले असल्याचे सांगितले. यातुनच देश सेवा करण्यासाठी प्रेरणा मिळाली. देश प्रथम असे सांगत बहीण व घरातील लोक मला सातत्याने प्रोत्साहित करत असल्याचे सांगितले.

यावेळी ग्रामस्थांनी तानाजी टेमकर यांची दोन्ही मुले रोशन व केतन हे देश सेवा करीत असल्याने त्यांचा आम्हाला अभिमान असल्याचे सांगितले.

रायगड, नवी मुंबई

राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ८०
www.ramprahar.com

◆ बुधवार, ७ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



## लोकशाही संस्था संपविण्याचे विरोधकांचे षड्यंत्र –मुख्यमंत्री

**मुंबई :** "काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून संवैधानिक संस्थांना बदनाम करून त्यांच्यावरील लोकांचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'एक्स्ट्रीम लेफ्टिस्ट' प्रकारचे राज्य देशात आणण्याचे प्रयत्न होत आहेत. भारतातील सर्व लोकशाही संस्था संपविण्याच्या दिशेने हे काम सुरू आहे", असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.६) मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना केला. मुंबईतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत विचारले असता पोलिसांकडून गैरवापर होत असल्याचा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी फेटाळला. मुंबई पोलीस व्यावसायिक असून ते कोणावरही चुकीची कारवाई करत नाहीत, असे त्यांनी सांगितले. कालच्या आदिवासी शिष्टमंडळाच्या मागण्या मान्य झाल्याबद्दल त्या विद्यार्थ्यांनी माझे अभिनंदन केले असून नाशिकमध्येही त्यांनी जल्लोष केला आणि फोनवरून माझ्याशी चर्चा केली, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली, मात्र काही एनएसयुआयचे पदाधिकारी आंदोलन सुरूच राहावे यासाठी प्रयत्न करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आज शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने होणार सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजसेवेला प्राधान्य देत अविरतपणे कार्यरत असलेले रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान, महाराष्ट्रतर्फे प्रतिष्ठेचा शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने सन्मान होणार आहे. मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिरात बुधवारी (दि. ७) दुपारी १२ वाजता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री व विद्यमान खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

### मुंबईत सोहळा, मान्यवरांची लाभणार उपस्थिती

या सोहळ्यास संस्थेच्या आधारस्तंभ प्रतिभाताई पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, राज्याचे माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, रोहयो,



फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, खासदार सुप्रिया सुळे, अभिनेता व समाजसेवक नाना पाटेकर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, सुरेश म्हात्रे, आमदार रोहित पवार, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक भावनेतून कार्य करीत असतात. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांचा सेवाभावी वारसा ते आजतागायत जपत आहेत. रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या शाळा-महाविद्यालयांना उभारी देण्याचे काम त्यांनी केले आहे तसेच विधायक उपक्रमांना ते पाठबळ देत असतात. अशा या दानशूर व्यक्तिमत्त्वाला जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला जाणार आहे.

या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजारामबुवा शेलार आणि सहकाऱ्यांनी केले आहे.

# दिवाळी अंकांतून साहित्य क्षेत्राला नवी उंची –ना. आशिष शेलार

## रौप्य महोत्सवी स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात

**पनवेल : हरेश साठे**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघाने दिवाळी अंकांची समृद्ध परंपरा केवळ जपली नाही, तर ती अधिक व्यापक करण्याचे काम केले आहे. साहित्य क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी गेली २५ वर्षे सातत्याने विविध उपक्रमांची मालिका आयोजित करून या क्षेत्राला मोठी उंची देण्याचे कार्य या संस्थांनी केले आहे, असे गौरवोद्गार राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी काढले.

मराठी साहित्य, पत्रकारिता, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिवाळी अंकांच्या समृद्ध परंपरेला गेली २५ वर्षे सातत्याने प्रोत्साहन देणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा पारितोषिक वितरण सोहळा पनवेलमध्ये मंगळवारी (दि.६) उत्साहपूर्ण वातावरणात झाला. मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते या स्पर्धेतील विजेत्या दिवाळी अंकांना तसेच विविध साहित्यिक




(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

व कलात्मक विभागांतील पुरस्कार विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या रौप्य महोत्सवी सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर होते, तर ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध साहित्यिक विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. (पान ७ वर..)

### पुढील वर्षापासून बक्षिसांच्या रकमेत तब्बल ५० टक्के वाढ

दिवाळी अंक स्पर्धेने यंदा रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले असून गेल्या २५ वर्षांत या स्पर्धेच्या माध्यमातून साहित्य, संस्कृती, विचार आणि पत्रकारितेच्या क्षेत्राला सातत्याने प्रोत्साहन देण्याचे कार्य झाले आहे. अक्षरांची ही समृद्ध परंपरा केवळ स्पर्धेपुरती मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. साहित्य आणि संस्कृतीची ही चळवळ यापुढेही तितक्याच उत्साहाने आणि व्यापकतेने अखंड सुरू ठेवण्याची ग्वाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी दिली. दिवाळी अंकांच्या माध्यमातून दर्जेदार साहित्यनिर्मितीला आणि लेखक-संपादकांच्या सर्जनशीलतेला अधिक बळ मिळावे हा या उपक्रमामागील मूलभूत हेतू आहे. त्यामुळेच पुढील वर्षापासून दिवाळी अंक स्पर्धेतील बक्षिसांच्या रकमेत तब्बल ५० टक्के वाढ करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा त्यांनी केली. साहित्यविश्वाला प्रोत्साहन देणाऱ्या या निर्णयातून लोकनेते रामशेठ ठाकूर यांची साहित्याविषयीची आस्था, सांस्कृतिक चळवळीप्रति असलेली बांधिलकी आणि नव्या पिढीतील लेखकांच्या प्रतिभेला व्यासपीठ देण्याची त्यांची दानशूर वृत्ती पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

# विविध घटकांसाठी महायुती सरकारचे महत्त्वपूर्ण निर्णय!

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी (दि. ६) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत विविध घटकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आले.

राज्यात संशोधन, नवोन्मेष, तंत्रज्ञान विकास, उद्योग संलग्न उच्च शिक्षण उत्कृष्टता केंद्रे यांच्या माध्यमातून सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये, संस्था आणि तंत्रनिकेतनमध्ये संशोधनास चालना देण्यासाठी सीएम सृष्टी योजना अमलात आणण्यास मान्यता देण्यात आली.

राज्याच्या पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना साहसी कामगिरीसाठी मुख्यमंत्री शौर्य पदक देण्यात येणार आहे. कर्तव्य बजावताना जोखीम पत्करून केलेल्या कामगिरीसाठी मुख्यमंत्री शौर्य पदक विजेत्यांना ५० हजार रुपये, पदक व प्रशस्तिपत्र मिळणार आहे. दरवर्षी महाराष्ट्र दिन १ मेच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री शौर्य पदकांची घोषणा करण्यात येणार आहे.

पारंपरिक दगडफोडी आणि गौण खनिजाचे उत्खनन करून उपजीविका करणाऱ्या वडार समाजासाठी गौण खनिज स्वामित्वधनासाठी (रॉयल्टी) सवलत आता वार्षिक उत्खनन मर्यादा २०० ब्रासवरून ५०० ब्रास करण्यास मंजुरी देण्यात आली. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील शासकीय वसतिगृहासाठी पात्र असूनही वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेता यावे यासाठी राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या वार्षिक अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठीच्या अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या पं. दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेतील भत्त्यांमध्ये सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली.

# पनवेल महानगरपालिकेच्या महासभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवारी (दि. ६) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली होती. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महासभेत विविध विषयांवर चर्चा करून मंजुरी देण्यात आली.

मंचावर उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते. या महासभेत रायगड जिल्हा परिषदेच्या एकूण ५१ शाळा पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबतचा विषय बहुमताने मंजूर करण्यात आला.

यावेळी २४ एप्रिल रोजीचा स्थगित विषय पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती अ,ब,क व ड मध्ये अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निष्कासन करण्याकामी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने पुरविण्याकामी निविदा मागविण्याबाबतचा विषय महासभेत स्थगित करण्यात आला.

२२ जुलै रोजीचा स्थगित विषय महापालिकेचा सन २०२५-२६ या कालावधीकरिता मुंबई विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेला पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (ईएसआर) सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबतचा विषय या महासभेत स्थगित करण्यात आला. (पान ७ वर..)



### 'त्या' अधिकाऱ्यांवर कारवाई करा –नगरसेवक परेश ठाकूर

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती अ,ब,क व ड मध्ये अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निष्कासन करण्यासाठी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने पुरविण्याकामी निविदा मागविण्याबाबतच्या विषयावर बोलताना माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी अतिक्रमणविरोधी विभागाच्या सहाय्यक आयुक्त रूपाली माने, अधीक्षक दशरथ भंडारी, अशोक डोंगरे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली.

प्रभाग 'ड'मध्ये अनेक अनधिकृत हातगाड्या व बेकायदेशीर व्यवसाय सुरू आहेत. त्यावर अधिकारी कारवाई करीत नाहीत. तीन महिन्यांत फक्त एक लाख रुपये दंड वसूल करतात, तर तक्रार केल्यावर तीन दिवसांत दोन लाखांपेक्षा जास्त दंड वसूल होतो. यावरून त्यांचे काम कसे सुरू आहे ते लक्षात येते. आमचे नगरसेवक सुमित झुंजारराव व विकास घरत यांनी चार दिवस या हातगाड्यांचे ड्रोण कॅमेऱ्याद्वारे शूटिंग केले असता प्रभाग'ड'मध्ये ७००पेक्षा जास्त हातगाड्या मोजण्यात आल्या. यावरून स्पष्ट होते की आजपर्यंत ५२ कोटी रुपये दंड वसूल होणे गरजेचे होते. महापालिकेचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांचे निलंबन करावे तसेच त्यांची तत्काळ बदली करण्याची मागणी नगरसेवक परेश ठाकूर यांनी केली. यावर सभागृहनेते प्रकाश बिनेदार यांनी हे अधिकारी तक्रार केलेल्या आमच्या नगरसेवकांची नावे अशा धंदेवाल्यांना सांगतात आणि हेच अधिकारी आज मुद्दाम ठरवून महासभेला गैरहजर राहिलेले दिसतात. त्यामुळे त्याबाबतचा प्रस्ताव स्थगित करण्याची मागणी त्यांनी केली. महापौर नितीन पाटील यांनी ती मान्य केली.

# दुष्काळावर उपाययोजना सुचवण्यासाठी अभ्यासगट

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात उद्भवलेल्या दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचवण्याकरिता अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या वतीने याबाबतचा शासन निर्णय मंगळवारी (दि.६) जारी करण्यात आला.

अपुऱ्या पावसामुळे उद्भवलेल्या दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी यापूर्वी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत करण्यात आली आहे. दरम्यान, या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या अनुषंगाने आता अभ्यासगट गठीत करण्यात आला आहे.

महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या अभ्यासगटात वित्त, नियोजन, ऊर्जा, वने या विभागांचे अपर मुख्य सचिव सदस्य आहेत तसेच मदत व पुनर्वसन, सहकार, मृद व जलसंधारण आणि जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव हेदेखील या अभ्यासगटात सदस्य असतील, तर कृषी आणि ग्रामविकास विभागाचे सचिव हे सदस्य आणि पदुम विभागाचे सचिव सदस्य सचिव असतील. दुष्काळजन्य परिस्थतीवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचे काम या अभ्यासगटाचे असेल.

### आजोबांकडून नातवाची हत्या

**लोणावळा :** मालमत्ता आणि आर्थिक व्यवहाराच्या वादातून आजोबांनीच आपल्या नातवाची गोळी झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना लोणावळ्यात घडली. अभय माणिक मराठे (३३) असे मृत तरुणाचे नाव असून मुख्य आरोपी मोतीराम मराठे यांच्यासह कुटुंबातील अन्य पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी हत्या लपवण्यासाठी रायफल साफ करताना अचानक गोळी सुटून अपघात झाला असा बनाव रचला होता, मात्र पोलीस तपासात प्रकार उघडकीस आला.



## संपादकीय

# सुरक्षेची नवी कसोटी

**फ्लायदुबईच्या विमानातील अलीकडच्या घटनेमुळे जगभरातील विमानसुरक्षा व्यवस्थेसमोर काही गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. अमेरिकेतील ९/११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर कॉकपिट सुरक्षित ठेवण्यासाठी बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था, अभेद्य दरवाजे आणि कठोर प्रवेशनियम आदी उपाययोजना करण्यात आल्या. बाहेरून होणारा दहशतवादी हल्ला रोखण्याच्या दृष्टीने त्या नक्कीच महत्त्वाच्या आहेत. पण आतूनच धोका निर्माण झाला तर काय? या प्रश्नाचे उत्तर आता शोधावे लागणार आहे.**

दुबईहून इस्रायलमधील तेल अवीवकडे निघालेल्या ‘फ्लायदुबई’ या हवाई कंपनीच्या विमानात घडलेली अलीकडची घटना ही केवळ एका भारतीय वैमानिकाच्या शौर्याची कहाणी नाही. आकाशात झेपावलेल्या विमानाची सुरक्षितता ही केवळ तंत्रज्ञानाची किंवा विमानतळावरील तपासणीची बाब राहिलेली नाही हे या घटनेने अवघ्या जगासमोर आणले. बहुस्तरीय, कठोर सुरक्षेच्या सर्व अभेद्य भिंती पार करून धोका विमानाच्या कॉकपिटमध्येही निर्माण होऊ शकतो हे या घटनेने दाखवून दिले. असा धोका निर्माण झाल्यास काय? फ्लायदुबईच्या विमानातील अलीकडची घटना या प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित करणारी ठरली आहे. किंबहुना, असा धोका निर्माण होऊ नये म्हणून काय उपाययोजना करता येईल यावर आता जगभरात विचार सुरू झाला आहे. या विमानातील सहवैमानिकाने वैमानिकावर हल्ला करून विमानाचा ताबा घेण्याचा कथित प्रयत्न केला. त्यामुळे विमान अचानक हजारो फूट खाली आले. मात्र भारतीय वैमानिक स्मित मच्छार यांच्या धैर्य, प्रसंगावधान आणि प्रशिक्षणामुळे मोठी दुर्घटना टळली. विमान ताब्यात घेतल्यानंतर तेल अवीवलगत असलेल्या बेन गुरियन विमानतळावर ते धडकवण्याची संबंधित सहवैमानिक हमाम अल–हमामी याची योजना होती असे वृत्त ‘द टाइम्स ऑफ इस्रायल’ने रविवारी प्रसिद्ध केले आहे. अन्य देशांप्रमाणेच भारतातही या घटनेमुळे सुरक्षाविषयक चर्चा सुरू झाली आहे. भारतातील विमान वाहतूक क्षेत्र गेल्या काही वर्षांत अभूतपूर्व वेगाने विस्तारत आहे. नव्या विमानतळांची उभारणी, वाढती प्रवासीसंख्या, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मार्गांचा विस्तार यामुळे भारताचे आकाश आता अधिक गजबजले आहे. या पार्श्वभूमीवर फ्लायदुबई घटनेनंतर भारतीय सुरक्षा आणि गुप्तचर यंत्रणांनी विद्यमान सुरक्षा कार्यपद्धतींचा आढावा सुरू केला आहे हे स्वागतार्हच आहे. प्रवाशांच्या तपासणीसोबतच कॉकपिटची सुरक्षा, विमानातील आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याची क्षमता आणि ‘आतच असलेला धोका’ यांचा विचार केला जात आहे. त्याकरिता संबंधित देशांबरोबर माहितीची देवाणघेवाण वाढवण्यावर भर दिला जात आहे. यापुढे वैमानिकांच्या भरतीवेळी होणारी पार्श्वभूमी तपासणी पुरेशी मानून चालणार नाही. त्यांचे मानसिक स्वास्थ्य, वर्तनातील बदल, संभाव्य कट्टरतावादी प्रभाव आणि डिजिटल पाऊलखुणा यांचा कायदेशीर चौकटीत सातत्याने आढावा घेण्याची आवश्यकता आहे. तसे करणे म्हणजे प्रत्येक वैमानिकाकडे संशयाच्या नजरेने पाहणे नव्हे. सक्षम सुरक्षा व्यवस्थेतूनच विश्वास अधिक मजबूत होत असतो. भारतीय वैमानिकाने दाखवलेले असामान्य धैर्य ही या घटनेतील सर्वात दिलासादायक बाब आहेच. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या शौर्याचे कौतुक केले आहे. मात्र एका शूर वैमानिकाच्या धैर्यावर विमान सुरक्षेची व्यवस्था विसंबून राहू शकत नाही. ‘आत्मनिर्भर भारत’ म्हणजे केवळ विमाननिर्मिती नव्हे. सुरक्षित हवाई उड्डाणाची हमी देणारी सक्षम व्यवस्था उभी करणेही त्याचाच भाग आहे. फ्लायदुबईची घटना अवघ्या जगासाठी इशारा आहे आणि त्याचवेळी आपली सुरक्षा व्यवस्था आणखी सक्षम करण्याची संधीही.

# मराठी काव्याचे प्रवर्तक केशवसूत



## निमित्त

आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे एक श्रेष्ठ कवी म्हणजे कृष्णाजी केशव दामले. काव्यरत्नावली या मासिकाचे संपादक नारायण नरसिंह फडणीस यांच्या सूचनेवरून त्यांनी ‘केशवसूत’ या टोपण–नावाचा स्वीकार केला. केशवसुतांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड या गावी ७ ऑक्टोबर १८६६ रोजी झाला. त्यांची आज जयंती.

केशवसुतांचे शिक्षण खेड, बडोदे, वर्धा, नागपूर व पुणे या ठिकाणी झाले. त्यांनी विद्यार्थिदशेतच काव्यलेखनास आरंभ केला असला तरी त्यांचा मुख्य काव्यरचनाकाल १८८५ ते १९०५ हाच होय. या काळातील त्यांच्या सुमारे १३५ कविता आज उपलब्ध आहेत. नागपुरास असताना रेव्ह. टिळक व कवी वसंत यांचा सहवास त्यांना लाभला होता. काव्य हे त्यांचे जीवनध्येय असल्याने स्वाभाविकपणेच त्यांनी काव्यरचनेच्या नव्या वाटा चोखाळल्या. या प्रयत्नात प्रारंभीच्या संस्कृत काव्याचा आदर्श अल्पकालीन ठरला व पूर्वकालीन मराठी काव्य प्रभावशून्य ठरले, परंतु इंग्रजीतील स्वच्छंदतावादी मनोवृत्तीच्या वड्‌र्स्वर्थ, शेली आणि कीट्‌स यांसारख्या कवींचे काव्य मात्र त्यांना प्रेरक व अनुकरणीय वाटले. इंग्रजी अभ्यासक्रमातून व वि.मो. महाजनींनी विविधज्ञानविस्तारातून प्रकाशित केलेल्या भाषांतरांवरून इंग्रजी स्वच्छंदतावादी काव्य त्यांस काहीसे परिचित झाले होते. त्या काव्याच्या चिंतन मननातून केशवसुतांनी आत्मलेखनात्मक स्फुट भावकविता लिहिली व मराठी कवितेला इंग्रजी काव्यातील आत्माविष्काराचे नवे व क्रांतिकारक वळण दिले. त्यांच्या काव्यात व्यक्तिगत स्नेहसंबंध, कवी व कवित्व, स्त्रीपुरुषांतील प्रेम, निसर्ग, सामाजिक बंडखोरी व गूढ (सक्षात्कारी) अनुभूती अशा विविध विषयांवरील भावानुभवांचा आविष्कार आढळतो.

केशवसुतांनी अशा जबाबदारीने लिहिलेल्या कवितांपैकी, ‘स्फूर्ति’, ‘कवितेचे प्रयोजन’, ‘आम्ही कोण?’ आणि ‘प्रतिभा’ या महत्त्वाच्या आहेत. ‘भृंग’, ‘पुष्पाप्रत’ व ‘फुलपांखरूं’ या त्यांच्या काही महत्त्वाच्या निसर्गकविता होत. प्रेमविषयक आत्मनिवेदन करणाऱ्या कविताही केशवसुतांनी लिहिल्या. क्रांतिकारक सामाजिक विचार ओजस्वीपणे व्यक्त करणाऱ्या त्यांच्या प्रसिद्ध कविता म्हणजे, ‘तुतारी’, ‘नवा शिपाई’ व ‘गोफण केली छान’ (१९०५) या होत. गूढ अनुभूती व तिची नावीन्यपूर्ण अभिव्यक्ती असलेली ‘झपूर्झा’ (१८९३) ही त्यांची कविता विशेष गाजली. त्यांच्या अन्य गूढगुंजनात्मक कवितांत ‘म्हातारी’ (१९०१) व ‘हरपले श्रेय’ (१९०५) यांचा समावेश होतो.

शिक्षणकालातच १८८०मध्ये त्यांचा विवाह झाला. मॅट्रिकनंतर (१८८९) मुंबईला १८९७पर्यंत निरनिराळ्या हंगामी नोकऱ्या केल्या. पुढे प्लेगमुळे मुंबई सोडून ते खानदेशात गेले. आरंभी भडगावच्या नगरपालिकेच्या शाळेत दुय्यम शिक्षकाची नोकरी केली. १९०१पासून फैजपूरला मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. १९०४मध्ये धारवाडच्या सरकारी शाळेत मराठीचे शिक्षक म्हणून बदली झाली. १९०५ साली हुबळीला गेले असताना ७ नोव्हेंबर रोजी प्लेगने त्यांचे निधन झाले. त्यांच्यामागून आठच दिवसांनी त्यांची पत्नीही मरण पावली. केशवसुतांचा काव्यसंग्रह त्यांच्या मृत्यूनंतर हरि नारायण आपटे यांनी प्रकाशित केला.

**–रा.श्री. जोग**

# मोदी @ २५ : २५ वर्षे राष्ट्रसेवेची, विकासाची आणि अभिमानाची





७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी या निष्ठावान राष्ट्रसेवकाने गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली आणि तेथून सुरू झालेला सेवेचा प्रवास पुढे २६ मे २०१४ रोजी भारताच्या पंतप्रधानपदापर्यंत पोहोचला. आज २५ वर्षांच्या या प्रवासाकडे मागे वळून पाहताना तो केवळ एका नेत्याच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख वाटत नाही; तो देशाच्या बदलत्या राजकीय, सामाजिक आणि विकासाच्या प्रवासाशी जोडलेला अध्याय ठरतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा २५ वर्षांचा ‘सेवा, संकल्प आणि समर्पण’चा प्रवास आहे. १४० कोटी भारतीयांच्या वाढत्या आत्मविश्वासाचा हा प्रवास आहे. यानिमित्ताने महाराष्ट्रातील १३ कोटी जनता आणि शिवसेनेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मनःपूर्वक शुभेच्छा.

वडनगरच्या मातीतील हा आवाज आज जागतिक व्यासपीठावर भारताच्या भूमिकेचा प्रभावी स्वर आहे. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून ७ ऑक्टोबर २००१ ते मे २०१४ या काळात मोदी यांनी राज्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. विनाशकारी भुज भूकंपाच्या पार्श्वभूमीवरच त्यांनी मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली. भुज आणि कच्छ परिसरातील पुनर्वसन, पुनर्बांधणी आणि नवनिर्माणाच्या कामांना वेग देण्यात आला. २००३ मध्ये ‘व्हायब्रंट गुजरात ग्लोबल समिट’ची सुरुवात केली. या परिषदेच्या माध्यमातून जगभरातील मोठ्या कंपन्या आणि उद्योगपतींना गुजरातमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित करण्यात आले. हे गुजरात मॉडेल देशवासियांना भावले. कारण त्याचवेळी देशात विकास या नावाखाली दिलेली पोकळ आश्वासने, भ्रष्टाचार आणि गरिबी हटवण्याच्या नावाखाली श्रीमंतांच्या तिजोऱ्या भरण्याच्या प्रयत्नांविरोधात असंतोष वाढत होता. त्या असंतोषाच्या ठिणग्यांचे राजकीय ऊर्जेत रूपांतर करण्याचे काम मोदीजींनी केले. २०१४ पूर्वीचा भारत आणि २०१४ नंतरचा भारत या दोघांमध्ये मोठा फरक दिसून येतो.

जेव्हा एका देशाचा पंतप्रधान बदलतो, तेव्हा केवळ सरकार बदलत नाही, देशाचे भविष्य बदलते आणि तोच करिष्मा २०१४ नंतर घडला. नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यानंतर केंद्र सरकारच्या धोरणांमध्ये विकास, पायाभूत सुविधा, डिजिटल तंत्रज्ञान, सामाजिक कल्याण आणि राष्ट्रीय सुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले. जनधन योजनेच्या माध्यमातून बँकिंग व्यवस्थेशी मोठ्या संख्येने नागरिकांना जोडण्याचा प्रयत्न झाला. थेट लाभ हस्तांतरण आणि सरकारी सेवांच्या डिजिटलीकरणाला वेग मिळाला. ‘स्वच्छ भारत मिशन’च्या माध्यमातून स्वच्छता आणि शौचालयनिर्मितीवर भर देण्यात आला. पंतप्रधान आवास योजना, उज्ज्वला योजना, जलजीवन मिशन आणि पीएम–किसान यांसारख्या योजनांमधून घर, स्वयंपाकाचे स्वच्छ इंधन, नळाद्वारे पाणी आणि शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत अशा विविध क्षेत्रांत सरकारने ऐतिहासिक काम केले. डिजिटल इंडिया आणि यूपीआयच्या विस्तारामुळे डिजिटल व्यवहारांच्या क्षेत्रात मोठा बदल झाला. महामार्ग, रेल्वे, विमानतळ आणि इतर पायाभूत सुविधांच्या विस्ताराला गती देण्यात आली.

‘मेक इन इंडिया’, ‘स्टार्टअप इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ यांसारख्या उपक्रमांमधून देशांतर्गत उत्पादन, गुंतवणूक आणि उद्योजकतेला चालना दिली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरण, नवीन फौजदारी कायदे आणि तिहेरी तलाकविरोधी कायदा यांसारखे निर्णयही मोदी सरकारच्या कार्यकाळात झाले. काश्मीरचे ३७० कलम हटवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्याचे धाडसही मोदी सरकारने दाखवले. गेल्या १२ वर्षांतील अशा असंख्य निर्णयांमुळे भारतीय राजकारण, अर्थकारण, प्रशासन आणि सामाजिक धोरणांच्या दिशेवर व्यापक आणि अत्यंत सकारात्मक परिणाम झाला. विकासाच्या अजेंड्यासोबत सांस्कृतिक वारशालाही केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न या काळात झाला. अयोध्येतील श्रीराम मंदिराची निर्मिती आणि रामलल्लांच्या प्राणप्रतिष्ठेचा देदीप्यमान सोहळा, काशी विश्वनाथ धामचा विकास, महाकाल लोक तसेच विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासातून धार्मिक पर्यटन आणि सांस्कृतिक वारसा अधोरेखित करण्यात आला. ‘विकास के साथ विरासत’ ही संकल्पना मांडत आधुनिक पायाभूत सुविधांसोबत भारताच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करण्यावर भर देण्यात आला.

महिला सक्षमीकरण हा केंद्र सरकारच्या विकासाचा आणखी एक महत्त्वाचा भाग. ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’पासून ‘लखपती दीदी’पर्यंत, उज्ज्वला, मुद्रा आणि स्वयं–सहायता बचतगटांपर्यंत महिलांचा आर्थिक आणि सामाजिक सहभाग वाढवण्याच्या विविध योजना राबवण्यात आल्या. महाराष्ट्रातही याच दिशेने महायुती सरकारने महिला सक्षमीकरणासाठी विविध निर्णय घेतले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना असो किंवा मुलींना उच्च शिक्षण देण्याचा निर्णय... महिला सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होते, कुटुंब सक्षम झाले तर समाज सक्षम होतो आणि राष्ट्राची शक्ती वाढते.राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रातही मोदी सरकारच्या काळात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी झाल्या. सीमापार दहशतवादाच्या प्रश्नावर भारताने अधिक कठोर भूमिका घेतली. ब्रिक्स, ग्लोबल साऊथ, हवामान बदल, डिजिटल तंत्रज्ञान, योग आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांसारख्या विषयांवर भारताने आपली एक वेगळी भूमिका मांडली आहे. आज भारताचा आवाज जगातील मोठ्या मंचांवर ठामपणे ऐकला जातो. भारताच्या वाढत्या आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक क्षमतेला आज महत्त्व प्राप्त झाले आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची नवी आणि सक्षम ओळख निर्माण करण्याचे श्रेय मोदीजींना आहे. त्यामुळेच जवळपास ३६ राष्ट्रांनी आपल्या सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी मोदीजींना गौरविले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारचा गेल्या १२ वर्षांचा कालखंड महाराष्ट्राच्या पायाभूत आणि आर्थिक विकासासाठीही महत्त्वाचा ठरला आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला मिळालेले साहाय्य केवळ निधीपुरते मर्यादित न राहता अनेक दीर्घकालीन प्रकल्पांना गती देणारे ठरले आहे. २०१४ पूर्वीच्या दहा वर्षांत म्हणजेच २००४ ते २०१४ या काळात महाराष्ट्राच्या विकासकामांसाठी दोन लाख कोटी केंद्र सरकारने दिले होते. २०१४ ते २०२४ या काळात महाराष्ट्राला १२ लाख कोटींचा निधी मिळाला. रेल्वे क्षेत्रातील तरतुदीतही मोठी वाढ झाली आहे. २००९ ते २०१४ या काळातील सरासरी वार्षिक तरतूद १,१७१ कोटी रुपये होती, तर २०२६–२७ मध्ये ती २३,९२६ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. आजच्या घडीला राज्यात सुमारे दीड लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू असून ‘अमृत भारत स्थानक योजने’अंतर्गत १२८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम सुरू आहे.

अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबई कोस्टल रोड, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन आणि कोकण–पालघरच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचे ठरणारे ७६ हजार कोटी रुपयांचे वाढवण बंदर असे प्रकल्प महाराष्ट्रासाठी सर्वार्थाने ‘गेमचेंजर’ प्रकल्प आहेत. कल्याणकारी योजनांच्या माध्यमातूनही महाराष्ट्रातील नागरिकांना केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ मिळत आहे. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मे २०२६ पर्यंत १८ लाख गरीब कुटुंबांची घरे पूर्ण झाली. जल जीवन मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नळाद्वारे पाणीपुरवठ्याचे प्रमाण ३३ टक्क्यांवरून ८९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. पीएम–किसान योजनेतून राज्यातील पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत दिली जात आहे. महाराष्ट्राच्या विकासाबरोबरच राज्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अस्मितेलाही केंद्र सरकारच्या निर्णयांमधून महत्त्व मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पंचतीर्थांचा विकास आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय हे महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे टप्पे ठरले आहेत.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी गुजरात आणि नरेंद्र मोदी यांच्या संदर्भात हिंदुत्वाच्या राजकारणाबाबत आपली भूमिका अनेकदा स्पष्टपणे मांडली होती. महाराष्ट्र आणि गुजरातच्या राजकीय प्रवासात हिंदुत्वाच्या विचाराचा हा संवाद जुना आहे. त्यामुळे महाराष्ट्र आणि नरेंद्र मोदीजी यांच्यातील राजकीय–सामाजिक संबंधांचा हा धागाही महत्त्वाचा ठरतो. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्यक्तिगत स्नेह मला आणि माझ्या संपूर्ण कुटुंबाला लाभला, हे माझे परमभाग्य आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या निधनाने आयुष्यात निर्माण झालेली पोकळी मोदीजींच्या आपुलकीने मला मोठे बळ दिले. प्रत्येक भेटीत ते “कैसे हैं एकनाथजी?” असे विचारतात आणि खांद्यावर हात ठेवतात. त्या क्षणी एक नवा विश्वास निर्माण होतो, नवी उमेद मिळते आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आणखी जोमाने काम करण्याचे बळ मिळते.

हा स्नेहाचा ऋणानुबंध माझ्यासाठी कायमच विशेष राहील. गेली २५ वर्षे सतत, अथक आणि अविश्रांत काम करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवभारताच्या निर्मितीचा ध्यास घेतला आहे. विरोधकांची अत्यंत जहरी अशी द्वेषमूलक टीका, चारित्र्यहननाचे प्रयत्न, ध्रुवीकरणाचे निराधार आरोप, निंदानालस्तीचे शाब्दिक बाण असा चहूबाजूंनी मारा सुरू असतानाही मोदीजींनी कधी लक्ष्यावरून आपली नजर ढळू दिली नाही. गेल्या २५ वर्षांत नरेंद्र मोदी यांच्या जबाबदाऱ्या बदलल्या, पदे बदलली; मात्र राष्ट्रसेवेचा संकल्प आणि निर्धार तसूभरही कमी झालेला नाही. २५ वर्षांचा हा प्रवास एका व्यक्तीच्या राजकीय कारकिर्दीचा केवळ कालावधी नाही. तो बदलत्या भारताच्या राजकीय आणि विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. गुजरातपासून दिल्लीपर्यंत व तेथून विकसित भारत २०४७च्या संकल्पापर्यंत पोहोचलेला प्रवास आता पुढील टप्प्याकडे पाहत आहे. आता पुढील मोठे लक्ष्य आहे‘विकसित भारत २०४७’. आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगत, आत्मनिर्भर आणि सुरक्षित भारत उभारण्याचे हे ध्येय आहे. गरिबांना संधी देणारा, तरुणांच्या स्वप्नांना पंख देणारा, महिलांना समान संधी आणि नेतृत्व देणारा आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणारा भारत घडवण्याचे उद्दिष्ट या संकल्पनेत मांडले गेले आहे.

अलीकडेच प्रसंगावधान राखून १७४ विमान प्रवाशांचे प्राण वाचवणारे कॅप्टन स्मित मच्छार यांनी पंतप्रधानांशी संवाद साधताना त्यांच्याकडून प्रेरणा घेतल्याचे सांगितले. अशा प्रसंगांतून नेतृत्वाचा मोदीजींचा व्यक्तिगत प्रभाव आणि जनमानसातील त्यांची प्रतिमा अधोरेखित होताना दिसते. लोकप्रियतेचे आणि कार्यकाळाचे आकडे अनेक नेत्यांच्या नावावर नोंदवले जातात, मात्र नरेंद्र मोदी यांच्या बाबतीत मोजली जाते ती केवळ दिवसांची संख्या नाही, तर त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांची व्याप्ती आणि त्यांनी उभा केलेला राजकीय प्रभाव. मोदीजींच्या आगामी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि राष्ट्रसेवेसाठी अफाट शक्ती देवो, हीच प्रार्थना.

**–एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र**

## चित्र रंगवा





# महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे निकाली काढा -जिल्हाधिकारी जावळे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वर्षानुवर्षे महसूल विभागाकडे प्रलंबित असलेली छोटी-मोठी प्रकरणामध्ये किरकोळ कारणांमुळे वाद वाढवत नेल्यास पक्षकारांचा वेळ, पैसा आणि ऊर्जा खर्च होते. पक्षकारांनी महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून परस्पर सामोपचाराने, संवादातून आणि सलोख्याच्या भूमिकेतून ही प्रकरणे निकाली काढावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाचा शुभारंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.अनंत पाटील (प्रभारी), ॲड. मच्छिंद म्हात्रे आणि मोठ्या संख्येने पक्षकार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले,अनेक वेळा जमिनीचा वाद, मालमत्तेशी संबंधित छोटासा प्रश्न किंवा इतर किरकोळ कारणांमुळे पक्षकारांमध्ये वाद निर्माण होतो. पूर्वजांची समान मालमत्ता किंवा एकच कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींमध्ये निर्माण झालेला वाद वर्षानुवर्षे सुरू राहिल्यास त्याचा परिणाम केवळ संबंधित प्रकरणापुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण कुटुंबावर होतो. एखाद्या प्रकरणासाठी वारंवार कार्यालये, न्यायालये आणि वकिलांकडे जावे लागल्याने पक्षकारांचा मोठ्या प्रमाणात वेळ खर्च होतो. प्रवास, वकिलांची फी आणि अन्य खर्चामुळे आर्थिक नुकसान होते. त्याचबरोबर कुटुंबासाठी, शेतीसाठी, व्यवसायासाठी किंवा अन्य उत्पादक कामांसाठी देता येणारा वेळही वाया जातो. त्यामुळे छोट्या-मोठ्या वादांना प्रतिष्ठेचा प्रश्न न बनविता परस्पर संवादातून तोडगा काढणे अधिक हिताचे असल्याचे ते म्हणाले.

महसूल प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्यामुळे संबंधित कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा मोठा वेळ त्यामध्ये खर्च होतो. वारंवार न्यायालयात किंवा कार्यालयात जाणे, वकिलांशी संपर्क साधणे आणि त्यासाठी होणारा खर्च याचा परिणाम कुटुंबाच्या दैनंदिन जीवनावरही होतो. कुटुंबाच्या प्रगतीसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, शेती व उत्पादनक्षम कामांसाठी किंवा व्यवसायासाठी वापरता येणारी ऊर्जा आणि वेळ वादामध्ये खर्च होतो.त्यामुळे पक्षकारांनी आपापसांतील मतभेद सामोपचाराने सोडवून पुढील पिढ्यांपर्यंत वादाचे ओझे जाऊ नये, यासाठी प्रयत्न करावेत. परस्परांमध्ये सलोखा निर्माण करून प्रकरण कायमस्वरूपी संपविल्यास कुटुंबातील वातावरणही सकारात्मक राहते .आणि संबंधित व्यक्तींना पुढील आयुष्यात अधिक चांगल्या पद्धतीने प्रगती करता येते, असेही जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

## भाजप जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर यांची आमदार अनिकेत तटकरे यांनी घेतली सांत्वनपर भेट

**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्याजवळील आमडोशी गावातील रहिवासी तथा भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर यांच्या मातोश्री कविता उत्तम जांबेकर (वय ६२) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले.



या दुःखद प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अनिकेत तटकरे यांनी आमडोशी येथे जाऊन सोपान जांबेकर व त्यांच्या परिवाराची सांत्वनपर भेट घेतली. त्यांनी जांबेकर कुटुंबीयांशी संवाद साधत दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला.

## पेण पालिकेचे महिला कौशल्य विकास शिबिर



**पेण : प्रतिनिधी**

पेण पालिकेच्या महिला कौशल्य विकास शिबिराला आजपासून नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करून प्रारंभ झाला आहे. यावेळी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी बोलताना माझ्या शहरातील माझ्या महिला वर्गाला सक्षम करणे हे आमचे कर्तव्य आहे आणि ते आम्ही पार पाडू असे सांगितले.

यावेळी प्रितम पाटील यांच्या सोबत उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील,महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील, बांधकाम सभापती स्मिता माळी, क्रीडा व शिक्षण सभापती आफ्रिन आखवरे, नगरसेविका मालती म्हात्रे, संगीता लाड, पल्लवी कालेकर, सुजाता डाकी, अरुणा पाटील, नगरसेवक अभिराज कडू, निळकंठ म्हात्रे, मितेश शहा, क्षितिज मल्टिपर्पज असोसिएशनच्या शितल माळी आदी उपस्थित होते.

कौशल्य विकासातून महिलांचे सक्षमीकरण करणे आणि महिलांना स्वावलंबनातून आत्मनिर्भरतेकडे घेऊन जाणे या उद्देशाने महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील यांनी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्याकडे प्रस्ताव मांडल्यानंतर प्रितम पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या स्तुत्य उपक्रमाला पसंती दिल्यानंतर आजपासून या शिबिराचे प्रारंभ करण्यात आले.

जिजामाता, सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या धाडसी महिला नसत्या तर महिला शिक्षणापासून वंचित राहिल्या असत्या, मात्र त्यांच्यामुळे महिलांना शिक्षणाची दारे खुली झाल्यानंतर आज महिला चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन शेतीच्या बांधापासून ते देशाच्या सीमेपर्यंत पोहोचल्या आहेत. मग याच महिला आपल्यातील कलागुण व्यक्त करण्यासाठी आणि त्यांना सक्षम बनविण्यासाठी आम्ही तयार केलेल्या बजेटमध्ये महिलांना झुकते माप दिले आहे.

## बस-ट्रक अपघातात सात जण जखमी

**खालापूर :** मुंबई -पुणे महामार्गावरील बोरघाटातील मिसिंग लिंक (कनेक्टिंग लिंक) वर लोणावळा हद्दीत मुंबई कडील बाजूस खाजगी बस आणि ट्रकचा अपघात झाला या अपघातात. बसमधील ७ जण जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून २ जणांना खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेतर १ प्रवाशाला सिद्धिविनायक हॉस्पिटल खोपोली शीळ फाटा येथे दाखल केले आहे तर ४ जणांना MGM हॉस्पीटल कळंबोली येथे हलविण्यात आले आहे. जितेंद्र वसंत राऊत (३१ )अदनान सय्यद मजहर (२४) दोघेही रा संभाजीनगर. समीर शेख रा अहिल्या नगर यांना पुढील उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल पनवेल येथे हलविण्यात आले आहे.हा अपघात पहाटे ५ वा सुमारास घडला. अपघातग्रस्त बस मधील प्रवाशांना अन्य बस मधून मुंबई ला रवाना करण्यात आले.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे - मोहो, तालुका- पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७२/१ | ०-३०-०० | ४.६२ | विजयकुमार रामचंद्र सुरशेटवार |
| ७२/४ | ०-२१-०० | ३.५६ | विजयकुमार रामचंद्र सुरशेटवार |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०६/१०/२०२६.

सही/-
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ
कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट
वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
ता. पनवेल, जि. रायगड
मो. क्र.: ९९३०३६९८६१


## शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा रायगड जिल्हा दौरा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे हे रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा सविस्तर दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.शुक्रवार, दि.०९ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद सभागृह, अलिबाग येथे सकाळी ९.४५ वा. ते दुपारी १२.१५ वा. "चला शाळेत जाऊ या अभियान" अंमलबजावणी आढावा बैठक उपस्थिती. दुपारी १२.३० वा. ते २.०० वा. शाळा भेटीचा कार्यक्रम. दुपारी २.०० वा. अलिबाग येथून शासकीय वाहनाने पनवेलकडे प्रयाण. दुपारी ३.१५ वा. पनवेल येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. प्रकाश कान्हा भोपी व इतर** यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:

**-: मिळकत वर्णन :-**

**मौजे - आकुर्ली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे/गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे - आर - पॉ. | आकार रु. - पै. |
|---|---|---|---|
| २३७ | ०<br>पो. ख. | ० हे - ०६ आर - ४० पॉ.<br>० हे - ०० आर - २० पॉ.<br>**० हे - ०६ आर - ६० पॉ.** | ० - ६१ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर **'१४ दिवसांच्या आत'** आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. शैलेश मनोहर पांचाळ
पत्ताः ऑफिस क्र. ३५, सत्य साई प्लाझा,
प्लॉट नं. ५, सेक्टर ११, नवीन पनवेल
(पू.) ४१० २०६, मो. ८२९१३२२३३८

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/१०/२०२६



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. विनोद विष्णू धरणेकर व इतर** यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:

**-: मिळकत वर्णन :-**

**मौजे - आकुर्ली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे/गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे - आर - पॉ. | आकार रु. - पै. |
|---|---|---|---|
| २३८ | २/ब<br>पो. ख. | ० हे - १९ आर - ७० पॉ.<br>० हे - ०१ आर - ८० पॉ.<br>**० हे - २१ आर - ५० पॉ.** | १ - ७५ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर **'१४ दिवसांच्या आत'** आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. शैलेश मनोहर पांचाळ
पत्ताः ऑफिस क्र. ३५, सत्य साई प्लाझा,
प्लॉट नं. ५, सेक्टर ११, नवीन पनवेल
(पू.) ४१० २०६, मो. ८२९१३२२३३८

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/१०/२०२६



**जाहीर नोटीस**

मे .कांडपिळे बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे श्री गौरव अ. कांडपिळे, पर्लहोम्स, फ्लॅट नं-६०४ ब, केमॉल जवळ ,तक्का ,ओल्ड पनवेल-४१०२०६. तमाम जनतेच्या माहितीसाठी खालील प्रमाणे जाहीर सुचना देत आहोत. आमचे नावे, ताबे कब्जातील मौजे-नेरे, ता. पनवेल, जि. रायगड येथे महसुल अभिलेखा मध्येवर्णन केल्या प्रमाणे खालील प्रमाणे नमुद केल्याप्रमाणे बिनशेती जमीन मिळकत आहे.

| अ.क्रं | मालमत्ता क्रं | क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|
| १ | ५१/५ | २९८० Sq.mt |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोसिएट प्लानर (नैना) सिडकोने आम्हांस वर नमूद जमीन मिळकतीमध्ये इमारती बांधण्यास त्यांचे पत्रक्र. सिडको/ नैना/पनवेल/नेरे /बीपी-००७४६/सिसि/२०२६/१५२३दिनांक-१२ मार्च २०२६.द्वारे परवानगी दिलेली आहे आणि सदर सक्षम नगररचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोसिएट प्लानर (नैना) सिडको यांनी त्यांचे पत्रक्र. सिडको/ नैना/पनवेल/नेरे /बीपी-००७४६/ सिसि/ २०२६/१५२३ दिनांक-१२ मार्च २०२६. द्वारे कमेन्समेंट सर्टिफिकेट दिलेले आहे. त्या अनुषंगाने आम्ही आमच्या प्रकल्पा संबंधीत खाली लप्रमाणे माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशी तकरत आहोत.

| | |
|---|---|
| विकासकाचे नाव आणि पत्ता | मे.कांडपिळे बिल्डर्स अँडडेव्हलपर्स तर्फे श्रीगौरव अ. कांडपिळे. |
| मालक नाव आणि पत्ता | मे.कांडपिळे बिल्डर्स अँडडेव्हलपर्स तर्फे श्रीगौरव अ. कांडपिळे , पर्ल होम्स, फ्लॅट नं-६०४ ब, केमॉल जवळ ,तक्का , ओल्डपनवेल-४१०२०६. |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता | मे.कांडपिळे बिल्डर्स अँडडेव्हल पर्स तर्फे श्रीगौरव अ. कांडपिळे, स.क्रम -५१/५,मौजे-नेरे, ता. पनवेल. |
| विकासनाची परवानगी मंजूर झाल्याचे आदेश क्रं. आणि दिनांक | सिडको/ नैना/पनवेल/नेरे /बीपी ००७४६ /सिसि /२०२६/ १५२३ दिनांक-१२ मार्च२०२६. |
| कमेन्समेंट सर्टिफिकेट आदेशक्र आणि दिनांक | सिडको/ नैना/पनवेल/नेरे /बीपी ००७४६ /सिसि /२०२६/ १५२३ दिनांक-१२ मार्च२०२६. |
| मंजूरफ्लो अरस्पेस इंडेक्स (एफ.एस.आय) | मंजूर एफ.एस.आय - १.६ |
| एकूण सदनिका आणि त्याचे मंजूर क्षेत्र | सदनिका ५९,व्यावसायिक दुकान २९, ग्राऊण्ड अधिक ७ मजल्याच्या मंजूर क्षेत्र इमारतीमध्ये बांधण्याची परवानगी मिळालेली आहे. ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र सदनिका-३२७३.१०२ चौ. मीटर, बांधीव क्षेत्र दुकान- १२१०.७२२ (बिल्टअप) आहे. |
| मंजूर नकाशे आणि इतर संबंधित कागतपत्राच्याप्राप्ती तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेच पत्ता | मे. कांडपिळे बिल्डर्स अँडडेव्हलपर्स तर्फे श्रीगौरव अ.कांडपिळे, पर्लहोम्स, फ्लॅटनं-६०४ ब, केमॉल जवळ ,तक्का ,ओल्ड पनवेल-४१०२०६. |
| आर्किटेक्ट् नाव | मे.स्वप्नील कल्याणकर आर्किटेक्टस, श्री. स्वप्निल कल्याणकर |
| स्ट्रक्चलरइंजिनी अरनाव | मे.प्राप्ती असोसिएटेस साश्री. राममराठे |

Place : Panvel
Date:05/108/2026

मे.कांडपिळे बिल्डर्स अँडडेव्हलपर्स तर्फे
श्रीगौरवअ. कांडपिळे



**PUBLIC NOTICE**

We, M/S KANDPILE BUILDERS & DEVELOPERS THROUGH MR. GAURAV.A KANDPILE,Pearl homes big. flat no 604b nr K mall takkapanvel, 410206, hereby give following Public Notice for information.
We,M/S KANDPILE BUILDERS & DEVELOPERS THROUGH MR.GAURAV.AKANDPILE,are the developers of the below mention Non-Agriculture Land at Village - Nere, Ta.- Panvel ,Dist.- Raigad. It is duly registered in the record of the GrampanchayatNere,Its description is as per following tables:

| Sr.No | Property No./Assessment No. | Area in Square Meter |
|---|---|---|
| 1 | 51/5 | 2980 Sq.mt |

The competent authority, (C.A.) i.e. The Associated Planner (NAINA) CIDCO has duly granted ted us permission to construct a building in the above-mentioned land vide his letter No.CIDCO/NAINA/Panvel/Nere Pada/BP-00746/CC/2026/1523Dated - 12 Mar 2026.Accordingly. We are hereby publishing following description of our contraction project on the above mentioned land for the information of general public.

| | |
|---|---|
| Name and address of the /Developer | M/S KANDPILE BUILDERS & DEVELOPERS THROUGH MR.GAURAV.A KANDPILE. |
| Name and address of the Owner | M/S KANDPILE BUILDERS & DEVELOPERS THROUGH MR.GAURAV.A KANDPILE, Pearl homes big. flat no 604b nr K mall takkapanvel, 410206. |
| Name of the Contractor & Description of property | M/S KANDPILE BUILDERS & DEVELOPERS THROUGH MR.GAURAV.A KANDPILE S.No – 51/5Of Village - Nere , Ta.- Panvel ,Dist.- Raigad. |
| The Order No & date of Grant of Permission Letter | CIDCO/NAINA/Panvel/Nere Pada/BP-00746/CC/2026/1523 Dated - 12 Mar 2026. |
| The Order No. & date of the Commencement Certificate | CIDCO/NAINA/Panvel/Nere Pada/BP-00746/CC/2026/1523 Dated - 12 Mar 2026. |
| Approved Floor Space Index (FSI) | Approved FSI – 1.6 |
| Total No. Flats and their Total Approved area. | The Permission has been granted to constructed total 59 flats& Commercial: 29 nos to be constructed in One (1) Plus seven (7) Floor Building whose total Construction area is Sale component: 3273.102 sq.m. Commercial: 1210.722sq.m |
| Address of the Place where approved Maps & Documents are available for verification. | M/S KANDPILE BUILDERS & DEVELOPERS THROUGH MR.GAURAV.A KANDPILE, Pearl homes big. flat no 604b nr K mall takkapanvel, 410206. |
| Name of the Architect | M/s. Swapnil KalyankarArchitects. Mr. Swapnil Kalyankar. |
| Name of the Structural Engineer | M/s. Prapti Associates Mr. Ram Marathe |

Place : Panvel
Date:05/108/2026

M/S KANDPILE BUILDERS & DEVELOPERS THROUGH
MR.GAURAV.A KANDPILE.



**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**
**कार्यालय : मु. वाशीवली, पो. पातळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**

**फेर ई-निविदा सुचना**

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव ग्रामनिधी - सन २०२६/२७ अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वडगांव हद्दीतील मौजे तळवली येथे अंतर्गत नळ पाणी पुरवठा पाईपलाईन टाकणे कामी महाराष्ट्र शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०६/१०/२०२६ रोजी फेर ई-निविदा सुचना प्रसिद्ध केलेल्या आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्ती साठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

सही/-
श्री. सुहास विष्णु वारे
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

सही/-
श्री. विनोद चांदोरकर
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

# स्थानिक भूमिपुत्रांच्या रोजगारासाठी महापौर नितीन पाटील यांचा पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा एमआयडीसी परिसरातील स्थानिक बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महापौर नितीन पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत तळोजा एमआयडीसीतील विविध कंपन्यांच्या प्रशासनासोबत बैठक घेण्यात आली. बैठकीत स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देताना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी कंपनी प्रशासनाकडे करण्यात आली.



तळोजा एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणावर उद्योग कार्यरत असताना स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी मिळणे आवश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच कंपन्यांच्या सीएसआर निधीचा उपयोग महानगरपालिका क्षेत्रातील संबंधित गावांच्या विकासासाठी तसेच शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांसाठी करण्यात यावा, अशी विनंतीही करण्यात आली. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, उद्योग व स्थानिक नागरिकांत समन्वय वाढवणे तसेच परिसराचा सर्वांगीण विकास साधणे या उद्देशाने कंपनी प्रशासनाने सकारात्मक सहकार्य करावे, अशी अपेक्षा महापौर नितीन पाटील यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रभाग समिती अ चे सभापती रवींद्र भगत, नगरसेवक नितेश पाटील, नगरसेविका विजयश्री पाटील, नगरसेवक दिनेश खानावकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत, भाजप पदाधिकारी गणेश पाटील, विजय पाटील, वृषल पाटील तसेच इतर पदाधिकारी आणि विविध कंपन्यांच्या प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार आणि परिसराच्या विकासासाठी उद्योग प्रशासनाने सहकार्य करावे यासाठी पुढील काळातही आवश्यक पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# सुशील शर्मा भाजप खालापूर पश्चिम मंडळ प्रभारी संपर्क प्रमुखपदी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली व भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सोशल मीडिया प्रमुख सुशील शर्मा यांची खालापूर पश्चिम मंडळाच्या प्रभारी संपर्क प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचा कामोठे शहर मंडळच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष व नगरसेवक विकास घरत, प्रभाग समिती सभापती रवींद्र जोशी, मंडल महामंत्री हर्षवर्धन पाटील, नगरसेवक प्रदीप भगत, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, महामंत्री विजय चिपळेकर, उपाध्यक्ष उत्तम जरग, सचिव सुरेश खरात, मानाजी पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, रश्मी भारद्वाज, मनीषा वनवे, राहुल बुधे, आदित्य भगत, भाऊ भगत, रवी गोवारी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी शर्मा यांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पनवेलची मतदारसंख्या चार लाखांपार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विधानसभा मतदारसंघातील मतदारयादीच्या विशेष सखोल फेरतपासणीला वेग आला आहे. सध्या मतदारसंघात चार लाख ७०४ मतदारांची नोंद असून यादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांपैकी १२ हजार जणांनी नव्याने मतदार नोंदणीसाठी अर्ज केला. आगामी काळात ५० ते ८० हजार नवीन मतदारांचे अर्ज येण्याची शक्यता निवडणूक विभागाने व्यक्त केली आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघात पूर्वी सुमारे सहा लाख ८४ हजार मतदार होते. एसआयआर प्रक्रियेत त्यापैकी चार लाख ७०४ मतदारांची नावे कायम राहिली असून उर्वरित सुमारे दीड लाख नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. मागील निवडणुकांतील मतदानाच्या आकडेवारीचा



आधार घेऊन मतदारयादीची फेरतपासणी केली जात आहे. एसआयआरमध्ये अर्ज न केलेल्या दोन लाख ८३ हजार मतदारांच्या नोंदींची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ८९ हजार मतदारांची नावे २००२च्या मतदारयादीशी जुळली नाहीत, तर ६१ हजार मतदारांच्या नाव, वय किंवा पत्त्यामध्ये दुरुस्ती आवश्यक असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय वृक्ष संवाद स्पर्धेत स्मित मोकल प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वृक्ष संवाद वक्तृत्व स्पर्धेत छत्रपती शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, गव्हाण येथील विद्यार्थी स्मित कुंदन मोकल याने प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले. त्याच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे गव्हाण विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

साज एंटरटेनमेंटच्या वतीने अखिल देसाई निर्मित व दिग्दर्शित सीड बॉल्स



या पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देणाऱ्या आगामी चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. एस. आर. दळवी फाउंडेशनच्या माध्यमातून ही स्पर्धा राबविण्यात आली. १० लाख वृक्ष लागवड मोहीम व एक कोटी सीड बॉल टॉसिंग या पर्यावरणपूरक उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन, पर्यावरण रक्षण आणि निसर्गप्रेमाचा संदेश प्रभावी संवादातून मांडला.

वृक्ष संवाद विषयावर स्मित मोकलने केलेले प्रभावी सादरीकरण, मुद्देसूद विचारमांडणी, ओघवती वक्तृत्वशैली व पर्यावरण संवर्धनाविषयीची तळमळ यामुळे परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. स्मितच्या यशाबद्दल छत्रपती शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे आधारस्तंभ तथा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, ज्युनिअर कॉलेजच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन वाय. टी. देशमुख, ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, विजय घरत, राहुल घरत, विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले, माजी शिक्षक सागरकुमार रंधवे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा संकटग्रस्तांना मदतीचा हात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिपळे-भोकरपाडा येथील स्वप्ननगरी होम्स रहिवासी सोसायटीतील नागरिकांच्या घरावरील पत्रे दोन दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार वारा-पावसामुळे उडून गेली होती. त्यामुळे निर्माण झालेली आर्थिक अडचण लक्षात घेऊन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून संबंधित नागरिकांना आर्थिक स्वरूपाची मदत करण्यात आली.

यावेळी पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, पनवेल तालुका पूर्व मंडल भाजप युवा मोर्चा अध्यक्ष विश्वजीत पाटील, भाजप बूथ अध्यक्ष भास्कर फुलोरे, युवा कार्यकर्ते धीरज फुलोरे, अभिजीत फुलोरे, स्वप्ननगरी होम्सचे अध्यक्ष गणेश सदमते उपस्थित होते. अडचणीच्या काळात नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वप्ननगरी होम्सच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात गांधी, शास्त्री जयंती उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, खारघर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय समितीच्या वतीने उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, डॉ. पूजा लांजेकर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी दोन्ही नेत्यांच्या राष्ट्रसेवेचे स्मरण करून आदरांजली वाहिली.

महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, स्वावलंबन व साधेपणातून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला व्यापक दिशा दिली. त्यांच्या विचारांनी संपूर्ण जगाला शांतता आणि मानवतेचा संदेश दिला. लालबहादूर शास्त्री यांनी साधेपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा व राष्ट्रप्रेमाचा आदर्श समाजासमोर ठेवला. जय जवान, जय किसान हा त्यांचा संदेश आजही देशाच्या विकासासाठी प्रेरणादायी आहे, असे मत ग्रंथपाल प्रा. समाधान बेहेरे यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांना गांधीजींच्या सत्य व अहिंसेच्या विचारांचे आणि शास्त्रीजींच्या प्रामाणिक व साध्या जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या आदर्शांनुसार समाज व राष्ट्राच्या उन्नतीसाठी योगदान देण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. या कार्यक्रमामुळे महाविद्यालयीन परिसरात राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि प्रेरणादायी विचारांचे वातावरण निर्माण झाले.




# नवरात्र-दिवाळीतही वाहतूक नियोजन करा

## भाजपच्या अमित ओझे यांची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाच्या काळात पनवेल शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांनी केलेल्या नियोजनाची पुनरावृत्ती आगामी नवरात्रोत्सव व दिवाळीतही करावी, अशी मागणी भाजप पनवेल शहर सरचिटणीस अमित ओझे यांनी केली आहे.



गणेशोत्सवादरम्यान मुख्य बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांसाठी करण्यात आलेल्या पार्किंग व्यवस्थेमुळे वाहतूक कोंडी टाळण्यास मदत झाली. वाहतूक शाखेने महापालिका प्रशासन व लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून केलेली पूर्वतयारी, तात्पुरते मार्गबदल, उरण फाटा व अटल सेतूचा योग्य वापर तसेच बेकायदा पार्किंगविरोधातील कारवाई यामुळे शहरातील प्रमुख मार्गांवरील वाहतूक सुरळीत राहिली, असा दावा ओझे यांनी केला.

या पार्श्वभूमीवर नवरात्रोत्सव व दिवाळीच्या काळातही पनवेल शहरातील मुख्य बाजारपेठा, एसटी बसस्थानक परिसर तसेच खरेदीच्या ठिकाणी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गणेशोत्सवाप्रमाणेच ट्रॅफिक व पार्किंग प्लॅन आधीच तयार करून त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# एपीएमसीच्या अधिकाऱ्याला लाच घेताना अटक

**नवी मुंबई : बातमीदार**

रजिस्टर पावतीवर सहीसाठी ४३ हजारांची लाच घेताना किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई (एपीएमसी, तुर्भे) येथील क्रमिक प्रभारी निरीक्षक व एका खासगी सुरक्षा रक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई ५ ऑक्टोबरला करण्यात आली. ३५ वर्षीय तक्रारदार रिक्षाचालक असून त्यांच्या ओळखीच्या एका व्यक्तीने माथाडी कामगाराचा राजीनामा दिल्याने त्या जागी स्वतःची नियुक्ती व्हावी यासाठी तक्रारदाराने २९ ऑगस्ट रोजी अर्ज केला होता.

सदर माथाडी कामगार रजिस्टर पावतीवर सहीच्या मोबदल्यात मंडळाच्या सचिवांच्या नावाने ५५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. याप्रकरणी तक्रारदाराने ५ ऑक्टोबर रोजी नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. तक्रारीच्या पडताळणीदरम्यान तडजोडीअंती ४३ हजार रुपये लाच घेण्याचे निश्चित झाले. त्यानंतर ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.४७ वाजण्याच्या सुमारास एपीएमसी फळ मार्केट, सेक्टर १९, तुर्भे येथील कार्यालयात सापळा रचण्यात आला. पंचांसमक्ष तक्रारदाराकडून ४३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना भरत राजाराम कदम (५६, क्रमिक प्रभारी निरीक्षक, वर्ग-३) आणि खासगी सुरक्षा रक्षक विजय नारायण पवार (३८) यांना ताब्यात घेण्यात आले.

# आमदार मंदा म्हात्रे यांच्या उपस्थितीत एसआरएचे सादरीकरण

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने सीबीडी बेलापूर येथील वारकरी भवन येथे एसआरए योजनेंतर्गत विशेष सादरीकरण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्यासह



पंचशील नगर १ आणि २, दुर्गामाता नगर, बालतुबाई नगर, टाटा नगर, संभाजी नगर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विशेष सादरीकरणाच्या माध्यमातून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेंतर्गत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या त्यांच्या भावी नव्या घरांची रचना, इमारतीचे स्वरूप, आधुनिक सोयीसुविधा आणि योजनेच्या पुढील प्रक्रियेची सविस्तर माहिती प्रत्यक्ष डिजिटल सादरीकरणाद्वारे दाखवण्यात आली. आपले नवीन घर प्रत्यक्ष कसे दिसेल हे पाहताना उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून आले.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, आम्ही फक्त बोलत नाही तर करून दाखवतो. सामान्य माणसाचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होणे त्याच्या आयुष्यातील सर्वांत मोठा आनंद असतो. बेलापूर मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित व आधुनिक सुविधांनी युक्त घर मिळावे यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत.

# नवी मुंबई विमानतळाच्या सेवेत 'फ्लाय ९१'ची भर



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या देशांतर्गत हवाई सेवेत फ्लाय ९१ या विमान कंपनीची भर पडली आहे. गोवा मुख्यालय असलेल्या या कंपनीच्या विमानाचे नवी मुंबई विमानतळावर प्रथमच आगमन झाले. हैदराबादहून आलेल्या विमानाचे विमानतळ प्रशासनाकडून जलतोफेच्या सलामीने स्वागत करण्यात आले. फ्लाय ९१च्या हिवाळी वेळापत्रकानुसार नवी मुंबईहून सिंधुदुर्ग, जळगाव, गोवा आणि लक्षद्वीपमधील अगत्ती या चार ठिकाणी थेट विमानसेवा सुरू होणार आहे.

त्यामुळे महाराष्ट्रासह गोवा आणि पश्चिम किनारपट्टीवरील पर्यटन व व्यावसायिक प्रवासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. नवी मुंबई हे फ्लाय ९१चे देशातील १४वे आणि महाराष्ट्रातील पाचवे गंतव्यस्थान ठरले आहे. कंपनीच्या हवाई जाळ्यात गोवा, सिंधुदुर्ग, जळगाव, सोलापूर, पुणे, बंगळुरू, हैदराबाद, अगत्ती, कोची, हुबळी, राजमुंद्री, विजयवाडा आणि तिरुपती या शहरांचा समावेश आहे.

# कमांडो-अतिरेक्यांच्या चकमकीचा थरार..!

## पनवेलमध्ये सुरक्षा यंत्रणांची रंगीत तालीम

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील टपाल नाका येथील बेथ एल प्रार्थनालयात सशस्त्र अतिरेकी घुसल्याचा संदेश मिळताच पोलिसांसह सुरक्षा यंत्रणा तातडीने ॲक्शन मोडमध्ये आली. कमांडो आणि अतिरेक्यांमध्ये चकमक सुरू झाल्याचे चित्र निर्माण झाल्याने परिसरात काही काळ थराराचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र ही प्रत्यक्ष घटना नसून सुरक्षा यंत्रणांकडून घेण्यात आलेली नियोजित मॉक ड्रिल असल्याचे स्पष्ट झाले.



अतिरेकी घुसल्याची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसराचा ताबा घेतला. संभाव्य दहशतवादी हल्ल्याच्या वेळी कोणत्या पद्धतीने कारवाई करावी, नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर कसे काढावे आणि संशयितांचा सामना कसा करावा याचे प्रात्यक्षिक या रंगीत तालमीत घेण्यात आले. या मॉक ड्रिलमध्ये पनवेल विभागाचे सहायक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, क्यूआरटी पथक, बीडीडीएस आणि श्वान पथक सहभागी झाले होते. कमांडो पथकाने प्रार्थनालयाच्या परिसरात प्रवेश करून अतिरेक्यांचा सामना करण्याची कारवाई केली.

आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्य व विविध यंत्रणांमधील समन्वय तपासण्यासाठी पनवेल पालिकेच्या अग्निशमन दलालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. पोलीस, कमांडो पथक व अग्निशमन दलाने संयुक्तपणे परिस्थिती हाताळण्याचा सराव केला. मॉक ड्रिलदरम्यान निर्माण झालेल्या थरारक दृश्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता, मात्र ही नियोजित सुरक्षा रंगीत तालीम असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. संभाव्य दहशतवादी हल्ल्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत विविध सुरक्षा व बचाव यंत्रणांची तत्परता आणि समन्वय तपासणे हा मॉक ड्रिलचा मुख्य उद्देश होता.

# माणगाव पोलिसांची जुगार अड्ड्यांवर कारवाई; १४ जणांवर गुन्हे दाखल

## एक लाख २४ हजार ५८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त

**माणगाव : बातमीदार**

माणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी निजामपूर टेकडी, निजामपूर गाव आणि माणगाव शहरातील खांदाड परिसर अशा तीन ठिकाणी धडक कारवाई केली. या कारवाईत जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण १४ जणांवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम १२(अ) अन्वये तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत पोलिसांनी एकूण १ लाख २४ हजार ५८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २८९/२०२६ अन्वये निजामपूर टेकडी येथे ४ ऑक्टोबर रोजी कारवाई करण्यात आली. या कारवाईत सहा जणांकडून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर ५ ऑक्टोबर रोजी निजामपूर गावातील बाजारपेठ परिसरात गुन्हा रजि. क्र. २९०/२०२६ अन्वये कारवाई करण्यात आली. येथे चार जण जुगार खेळताना आढळून आले.

याशिवाय ५ ऑक्टोबर रोजी माणगाव शहरातील खांदाड येथील सिद्धीनगर परिसरात वाई बँकेच्या पाठीमागील पडीक इमारतीत पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत चार जण जुगार खेळताना आढळून आल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याकडूनही जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व मोबाईल जप्त करण्यात आले.

या तीनही कारवायांमध्ये एकूण १४ आरोपींकडून १ लाख २४ हजार ५८५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. माणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर जुगाराविरोधात पोलिसांनी केलेल्या या सलग कारवाईमुळे जुगार खेळविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रायगड, अपर पोलीस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस निरीक्षक मारुती आंधळे व त्यांच्या पथकाने केली आहे.

# रिस गणेशनगर येथे घरफोडी; चार लाख ८० हजारांचा ऐवज चोरीला

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रिस गणेशनगर येथे बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरातील सुमारे ४ लाख ८० हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजल्यापासून दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजेपर्यंत मौजे रिस गणेशनगर, घर क्रमांक ४०४, खालापूर येथे ही घरफोडी झाली. अज्ञात व्यक्तीने बंद घराच्या दरवाजाचे कुलूप हत्याराच्या साहाय्याने तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण सुमारे ४ लाख,८० हजार रुपयांचा मुद्देमाल फिर्यादीच्या चोरून नेला.

या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाचकर करीत आहेत. अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# विभागीय अधिकारी संवर्गासाठी तांत्रिक कार्यशाळेचे आयोजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

प्रधान महालेखाकार कार्यालय महाराष्ट्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, विभागीय अधिकारी संवर्गाची व्यावसायिक क्षमता, तांत्रिक ज्ञान आणि कार्यक्षमता वाढवण्याच्या उद्देशाने रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे एक दिवसीय तांत्रिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन नागपूरच्या प्रधान महालेखाकार सुहासिनी गौतमोरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. याप्रसंगी वरिष्ठ उपमहालेखाकार डॉ. भूषण भिरुड, रायगड बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता विवेक बाधे उपस्थित होते.

पान ३ वरुन

## दिवाळी अंकांतून साहित्य क्षेत्राला नवी उंची –ना. आशिष शेलार

यावेळी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सचिव व नगरसेवक परेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, विश्वस्त राही भिडे, देवदास मटाले, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, माजी नगरसेवक अनिल भगत, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे यांच्यासह साहित्य, पत्रकारिता, कला, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, संपादक, लेखक, साहित्यिक तसेच रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री आशिष शेलार यांनी पुढे बोलताना म्हटले की, दिवाळी अंक ही मराठी साहित्य आणि संस्कृतीची प्रदीर्घ परंपरा असून या परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी गेल्या २५ वर्षांपासून आयोजित करण्यात येणारी दिवाळी अंक स्पर्धा ही केवळ स्पर्धा न राहता साहित्यिक, लेखक, संपादक आणि कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी चळवळ ठरली आहे. या सातत्यपूर्ण उपक्रमातून अनेक साहित्यिकांना प्रोत्साहन मिळाले असून दिवाळी अंकांच्या माध्यमातून मराठी साहित्यविश्व अधिक समृद्ध झाले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघाने रौप्य महोत्सवी वर्षापर्यंत ही परंपरा अखंडपणे पुढे नेल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले. साहित्य, पत्रकारिता आणि संस्कृतीच्या क्षेत्राला प्रोत्साहन देणारे असे उपक्रम भविष्यातही सातत्याने सुरू राहावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

अक्षरांमध्ये मोठी ताकद असते. अक्षरांच्या माध्यमातून विचारांची देवाणघेवाण होते, संस्कारांची जडणघडण होते आणि शुद्ध मन घडत जाते. दिवाळी अंक हे केवळ मनोरंजनाचे माध्यम न राहता त्यांनी साहित्याची आणि विचारांची चळवळ उभी केली आहे. या चळवळीच्या माध्यमातून समाजाला ज्ञान, संस्कार आणि वैचारिक समृद्धीची दिशा मिळत आहे. या विचारांच्या आणि संस्कारांच्या वाटचालीत समाजासाठी सर्वस्व अर्पण करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. समाजाच्या गरजा ओळखून शिक्षण, सामाजिक कार्य, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत त्यांनी केलेले दान हे केवळ आर्थिक मदत नसून समाज घडविण्याची एक व्यापक भूमिका आहे. म्हणूनच त्यांना ‘दानहृदयसम्राट’ ही उपाधी दिली आहे. शुद्ध ज्ञानाची निर्मिती ही केवळ शब्दांतून होत नाही; त्यासाठी अंतःकरणाची शुद्धता, सेवाभाव आणि भक्तीभाव आवश्यक असतो. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्यातून हाच सेवाभाव सातत्याने प्रकट होताना दिसतो, असेही ना. शेलार यांनी नमूद केले.

**साहित्य आणि संस्कृतीची चळवळ अखंडपणे सुरू राहील –लोकनेते रामशेठ ठाकूर**

अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, १९९६ साली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. दिवाळी अंक स्पर्धेलाही यंदा २५ वर्षे पूर्ण झाली असून साहित्य आणि संस्कृतीची ही चळवळ यापुढेही अखंडपणे सुरू राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी पुढील वर्षापासून दिवाळी अंक स्पर्धेतील बक्षिसांच्या रकमेत तब्बल ५० टक्के वाढ करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. साहित्य क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा अधिक व्यापक आणि भव्य स्वरूपात पुढे नेण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, साहित्य, संस्कृती आणि कला क्षेत्राला सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांचा सातत्याने पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या सहकार्यामुळे या क्षेत्रातील विविध उपक्रमांना मोठी चालना मिळत आहे. मराठी साहित्य क्षेत्राला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहतील, असा विश्वासही रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला. साहित्य, संस्कृती आणि कला ही आपल्या समाजाची समृद्ध परंपरा आहे. या क्षेत्रावर आपण सर्वांनी मनापासून प्रेम करत राहिले पाहिजे आणि त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहचवणे गरजेचे –विश्वास पाटील**

प्रमुख पाहुणे म्हणून पानिपतकार विश्वास पाटील यांनी आपल्या भाषणात म्हटले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या श्वासातून आणि ध्यासातून लोकनेते रामशेठ ठाकूर कार्यरत आहेत. दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी कर्मवीरांचा वारसा केवळ जपला नाही, तर तो पुढे नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. रायगड जिल्ह्याचे नाव घेतले की मला विशेष आनंद होतो; कारण या जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मला लाभली आहे. रायगडच्या प्रत्येक कार्यामागे इतिहासाचा एक धागा जोडलेला आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

दिवाळी अंकांच्या समृद्ध परंपरेचा संदर्भ देताना विश्वास पाटील म्हणाले की, ‘मनोरंजन’ मासिकाच्या माध्यमातून दिवाळी अंकाची सुरुवात झाली आणि त्या पहिल्या अंकाला आता ११७ वर्षे पूर्ण झाली आहेत. ही परंपरा केवळ टिकवणे नव्हे, तर नव्या पिढीपर्यंत पोहचवणे ही आजची गरज आहे. गेली २५ वर्षे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून दिवाळी अंक स्पर्धा अखंडपणे सुरू आहे, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. दिवाळी अंक काढणे हे सोपे काम नाही. त्यासाठी लेखक, संपादक, मुद्रक आणि प्रकाशक यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असतात. या साहित्यिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण काम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ संयुक्तपणे करत आहेत. त्यामुळे दिवाळी अंकांची समृद्ध परंपरा जपण्याबरोबरच साहित्यनिर्मितीला आणि नव्या लेखकांना व्यासपीठ मिळत आहे. भाषा कोणतीही असो, संस्कारांच्या दृष्टीने मातृभाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मातृभाषेतून विचार, संस्कार आणि मूल्यांची जडणघडण होत असते. लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून साहित्यिक ऊर्जा निर्माण करण्याचे आणि ती समाजापर्यंत पोहचवण्याचे कार्य होतेय ही अभिमानाची बाब आहे. सार्वजनिक वाचनालय हे केवळ पुस्तके उपलब्ध करून देणारे ठिकाण नसून ते संस्कारांची पाणपोई आहे. वाचनातून विचार समृद्ध होतात, संस्कार दृढ होतात आणि समाजाची वैचारिक जडणघडण होते. त्यामुळे साहित्य, वाचन आणि संस्कृतीची ही चळवळ अधिक व्यापक करण्याची गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले.

**दिवाळी अंकांची समृद्ध परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहचविण्याचा संकल्प –आमदार प्रशांत ठाकूर**

यावेळी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, आजच्या या रौप्य महोत्सवी सोहळ्याला महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांच्यासह साहित्य, कला, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची लाभलेली उपस्थिती आमच्यासाठी अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी आहे. या सर्व मान्यवरांनी आपल्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढविली, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार! महाराष्ट्राला दिवाळी अंकांची शंभर वर्षांहून अधिक काळाची समृद्ध आणि वैभवशाली परंपरा लाभली आहे. साहित्य, विचार, ज्ञान आणि संस्कृतीचा प्रकाश घराघरांत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दिवाळी अंकांनी सातत्याने केले आहे. या समृद्ध परंपरेचा एक छोटासा भाग होण्याची आणि तिच्या संवर्धनासह अधिक समृद्धीसाठी योगदान देण्याची संधी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाला मिळाली, ही आमच्यासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सहकार्यामुळे या उपक्रमाला व्यापक आणि प्रतिष्ठित राज्यस्तरीय व्यासपीठ प्राप्त झाले.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्रकाशित होणाऱ्या दर्जेदार दिवाळी अंकांना प्रोत्साहन देण्याबरोबरच त्यांच्या साहित्यिक, वैचारिक, सामाजिक आणि संपादकीय योगदानाचा गौरव करण्याची संधी या स्पर्धेच्या माध्यमातून मिळाली. त्यामुळे ही स्पर्धा केवळ पुरस्कार देणारी स्पर्धा न राहता महाराष्ट्राच्या साहित्यिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्राला दिशा देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य आणि सांस्कृतिक क्षेत्रांत सातत्याने भरीव योगदान दिले आहे, मात्र दिवाळी अंक स्पर्धेला आमच्या दृष्टीने विशेष आणि भावनिक स्थान आहे. कारण ही केवळ एक स्पर्धा नाही; तर वाचनसंस्कृती जोपासणारी, लेखनकौशल्याला प्रोत्साहन देणारी, साहित्यनिर्मितीला चालना देणारी आणि संपादकीय सर्जनशीलतेचा गौरव करणारी एक व्यापक साहित्यिक चळवळ आहे. या स्पर्धेचा २५ वर्षांचा प्रवास निश्चितच अभिमानास्पद आहे. कोणताही उपक्रम सुरू करणे सोपे असते, मात्र तो सातत्याने २५ वर्षे सुरू ठेवणे, त्याचा दर्जा कायम राखणे आणि प्रत्येक वर्षी संपादक, लेखक, साहित्यिक, पत्रकार व वाचकांना नव्या उत्साहाने या प्रवाहाशी जोडून ठेवणे, ही खरी कसोटी असते. या कसोटीवर ही स्पर्धा यशस्वी ठरली आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

२५ वर्षांचा हा प्रवास म्हणजे केवळ काळाचा टप्पा नसून साहित्य, पत्रकारिता आणि वाचनसंस्कृतीवरील सातत्यपूर्ण विश्वासाची साक्ष आहे. या रौप्य महोत्सवी प्रवासात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांचे, परीक्षकांचे, संपादकांचे, लेखकांचे, पत्रकारांचे, साहित्यिकांचे, सहकाऱ्यांचे तसेच या उपक्रमाला सातत्याने प्रतिसाद देणाऱ्या वाचकांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार. दिवाळी अंकांची ही समृद्ध परंपरा केवळ पुढे चालू राहू नये, तर नव्या पिढीपर्यंत अधिक व्यापक स्वरूपात पोहचावी, नव्या लेखकांना व्यासपीठ मिळावे, वाचनाची गोडी वाढावी आणि साहित्यनिर्मितीचा हा प्रवाह अधिक समृद्ध व्हावा हाच या रौप्य महोत्सवी वर्षाचा खरा संकल्प आहे. या संकल्पासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघाची ही साहित्यिक वाटचाल भविष्यातही अशीच अखंड सुरू राहील, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

या सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक कुणाल रेगे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व नगरसेवक परेश ठाकूर यांनी मानले.

**देशातील सर्वाधिक बक्षीस रकमेची ही दिवाळी अंक स्पर्धा असून गेली २५ वर्षे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी भरघोस बक्षिसांच्या माध्यमातून दिवाळी अंकांच्या समृद्ध परंपरेला सातत्याने प्रोत्साहन दिले आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आणि अखंड वाटचालीचे संपूर्ण श्रेय लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या साहित्यप्रेमाला व प्रोत्साहनाला जाते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शंभरावा वाढदिवस साजरा होईल, त्यावेळी या दिवाळी अंक स्पर्धेचेही ५०वे वर्ष असेल. हा दुर्मीळ आणि ऐतिहासिक योगायोग ठरेल. त्यामुळे या दोन्ही सोहळ्यांचा भव्य संगम साधत हे दोन्ही सोहळे मोठ्या मैदानावर रसिकांच्या उपस्थितीत दिमाखात साजरे व्हावेत, अशी माझी मनापासून इच्छा आहे.**

**–संदीप चव्हाण,**
**अध्यक्ष, मुंबई मराठी पत्रकार संघ**

**‘दीपावली’ला राज्यस्तरीय प्रथम क्रमांक**

राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत ‘दीपावली’ या अंकाने प्रथम क्रमांक पटकावत एक लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळविले. या अंकाचे संपादक अशोक कोठावळे आहेत. ‘मुक्त संवाद’ या अंकाने द्वितीय क्रमांक मिळवित ५० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले असून या अंकाचे संपादक विवेक कोरडे आहेत. तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. ‘वसा’ आणि ‘अक्षरलिपी’ या दोन्ही अंकांना संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळाला असून त्यांना एकत्रित ३० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. ‘वसा’च्या संपादक सई पवार, तर ‘अक्षरलिपी’च्या संपादिका सौ. शर्मिष्ठा भोसले आहेत. राज्यस्तरीय स्पर्धेत विविध साहित्यिक आणि कलात्मक विभागांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अंकांचा आणि साहित्यिकांचाही यावेळी गौरव करण्यात आला. ‘बाईमाणूस’ या अंकाला लक्षवेधी उत्कृष्ट अंकाचा पुरस्कार मिळाला असून संपादक प्रशांत पवार यांना १५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. ‘धनंजय’ अंकातील ‘आवाज’ या कथेसाठी लेखिका मनस्विनी लता रवींद्र यांना उत्कृष्ट कथा पुरस्कार म्हणून ७ हजार रुपये, तर ‘ललित’ अंकातील ‘टॉलस्टॉयची सायकल’ या लेखासाठी डॉ. नंदू मुलमुले यांना उत्कृष्ट लेख पुरस्कार म्हणून पाच हजार रुपये देण्यात आले. ‘युगांतर’ अंकातील ‘त्याने तिरंगा पाहिला’ या कवितेसाठी कवी सतीश लोले यांना उत्कृष्ट कविता पुरस्कार मिळाला. ‘नवभारत’ या अंकाला उत्कृष्ट विशेषांक पुरस्कार देण्यात आला असून संपादक निरंजन हातेकर यांना १५ हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. बालसाहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी ‘मुलांचे मासिक’ या अंकाला उत्कृष्ट बाल दिवाळी अंक पुरस्कार देण्यात आला असून संपादक जयंत मोडक यांना सात हजार ५०० रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. ‘अक्षर’ अंकातील ‘युद्धकांड’ या परिसंवादासाठी मीना कर्णिक आणि हेमंत कर्णिक यांना लक्षवेधी परिसंवाद पुरस्कार, तर ‘शब्दांगण’ अंकातील आसाराम लोमटे यांच्या मुलाखतीसाठी मुलाखतकार मनीषा उगले यांना लक्षवेधी मुलाखत पुरस्कार देण्यात आला, तर साप्ताहिक ‘विवेक’च्या मुखपृष्ठासाठी चित्रकार विनायक खरात यांना सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ पुरस्कार, तर ज्ञानेश बेलेकर यांना सर्वोत्कृष्ट व्यंगचित्र पुरस्कार देण्यात आला.

**रायगड जिल्ह्यात ‘इंद्रधनू’ प्रथम**

रायगड जिल्ह्यातील दिवाळी अंकांना प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत ‘इंद्रधनू’ या दिवाळी अंकाने प्रथम क्रमांक पटकावत ४० हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. या अंकाचे संपादक विजय पवार आहेत. ‘आगरी दर्पण’ने द्वितीय क्रमांक मिळवत २० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले असून या अंकाचे संपादक दीपक राजाराम म्हात्रे आहेत. ‘शब्दसंवाद’ने तृतीय क्रमांक मिळवित १० हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. या अंकाचे संपादक विनोद बाबूराव साळवी आहेत. ‘रसायनी टाइम्स’ आणि ‘पनवेल टाइम्स’ या अंकांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला. अनुक्रमे संपादक अनिल भोळे आणि गणेश कोळी यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. रायगड जिल्हास्तरीय साहित्य पुरस्कारांमध्ये ‘आगरी दर्पण’ अंकातील ‘गॉटर’ या कथेसाठी किरण शेले यांना उत्कृष्ट कथा पुरस्कार, ‘श्री समर्थ विचार’मधील ‘ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची दुर्दशा’ या लेखासाठी अरविंद पाशिलकर यांना उत्कृष्ट लेख पुरस्कार, तर ‘म्हसळा टाइम्स’मधील ‘चाळ’ या कवितेसाठी कविता झुंजारराव यांना उत्कृष्ट कविता पुरस्कार देण्यात आला.

**साहित्यिक गुणवत्ता आणि सर्जनशीलतेचा कस**

राज्यभरातून प्राप्त झालेल्या दिवाळी अंकांचे परीक्षण साहित्यिक गुणवत्ता, आशय, विषयाची निवड, मांडणी, पत्रकारितेचा दर्जा, सामाजिक भान, कलात्मकता, सर्जनशीलता आणि वाचनीयता या विविध निकषांच्या आधारे करण्यात आले. या स्पर्धेसाठी वीणा सानेकर, रेखा देशपांडे आणि सुप्रसिद्ध सुलेखनकार सुनील धोपावकर यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली, तर स्पर्धा समन्वयक म्हणून दीपक म्हात्रे यांनी काम पाहिले.

**डिजिटल दिवाळी अंकांनाही प्रोत्साहन**

बदलत्या काळानुसार दिवाळी अंकांच्या स्वरूपात होत असलेल्या परिवर्तनाची दखल घेत यंदापासून डिजिटल दिवाळी अंकांचाही या स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. डिजिटल माध्यमातून साहित्य, कला आणि वैचारिक लेखन सादर करणाऱ्या निर्मात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिके निश्चित करण्यात आली आहेत. मुद्रित दिवाळी अंकांच्या प्रदीर्घ परंपरेसोबतच डिजिटल माध्यमातून मराठी साहित्याचा विस्तार व्हावा, नव्या पिढीतील लेखक आणि सर्जकांना व्यासपीठ मिळावे हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

**२५ वर्षांचा प्रवास ठरला प्रेरणादायी**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या २५ वर्षांपासून दिवाळी अंक स्पर्धेचे सातत्याने आयोजन केले जात आहे. या प्रदीर्घ प्रवासात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील दिवाळी अंकांना व्यासपीठ, प्रोत्साहन आणि सन्मान मिळाला असून अनेक लेखक, साहित्यिक, संपादक, चित्रकार आणि कलावंतांच्या सर्जनशीलतेचा गौरव या स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात आला आहे. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता दिवाळी अंकांच्या २५ वर्षांच्या समृद्ध साहित्यिक, सांस्कृतिक आणि पत्रकारितेच्या प्रवासाचा गौरव करणारा ऐतिहासिक टप्पा ठरला. यानिमित्ताने मराठी साहित्य आणि पत्रकारितेच्या समृद्ध परंपरेला पुढे नेण्याचा संकल्प अधिक दृढ करण्यात आला. साहित्यिकांचा सन्मान, विजेत्या दिवाळी अंकांचा गौरव, नव्या प्रतिभेला प्रोत्साहन तसेच बदलत्या काळानुरूप डिजिटल माध्यमांना मिळालेले नवे व्यासपीठ यामुळे रौप्य महोत्सवी वर्षाचा हा सोहळा संस्मरणीय ठरला. गेल्या २५ वर्षांचा हा प्रवास केवळ एका स्पर्धेचा प्रवास नसून मराठी साहित्य, पत्रकारिता आणि सर्जनशीलतेला सातत्याने समृद्ध करणाऱ्या एका प्रेरणादायी साहित्यिक चळवळीचा प्रवास आहे. काळ बदलला, माध्यमे बदलली, अभिव्यक्तीची साधने बदलली; मात्र दर्जेदार साहित्याला प्रोत्साहन देण्याची आणि प्रतिभेला सन्मान देण्याची या उपक्रमाची भूमिका आजही तितकीच भक्कम आहे. रौप्य महोत्सवी वर्षाने या समृद्ध परंपरेला नव्या उंचीवर नेऊन पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा आणि नवा संकल्प दिला आहे.

## पनवेल महानगरपालिकेच्या महासभेत विविध विषयांना मंजुरी

प्रभाग समिती ब व इतर रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षाकरिता झाकणे लावणे व किरकोळ दुरूस्ती करण्याबाबतचा विषय स्थगित करण्यात आला.

प्रभाग समिती क्र.११.१२.१३ व १४मध्ये समाविष्ट होणाऱ्या गटारांची सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षाकरिता रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार झाकणे लावणे व किरकोळ दुरूस्ती करण्याबाबतचा विषय स्थगित करण्यात आला.

महापालिका मालकीच्या इमारतीची देखभाल व दुरूस्ती (नूतनीकरण) वार्षिक तत्त्वावर करणे (दोन वर्षांकरिता : सन २०२६-२७ व २०२७-२८करिता) हा विषय सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला.

प्रभाग समिती क, कामोठे येथील रस्त्यांवर महापालिका मालकीच्या मोकळ्या भूखंडावर वार्षिक तत्त्वावर माहितीदर्शक फलक बसविणे व रोड मार्किंग करणे (दोन वर्षांकरिता : सन २०२६-२७ व २०२७-२८करिता) हा विषय मंजूर करण्यात आला.

प्रभाग समिती ड व इतर रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षांकरिता झाकणे लावणे व किरकोळ दुरूस्ती करणे हा विषय स्थगित करण्यात आला.

प्रभाग समिती ड पनवेल येथील रस्त्यांवर महापालिका मालकीच्या मोकळ्या भूखंडावर वार्षिक तत्त्वावर माहितीदर्शक फलक बसविणे व रोड मार्किंग करणे (दोन वर्षांकरिता : सन २०२६-२७ व २०२७-२८करिता) हा विषय मंजूर करण्यात आला.

कळंबोली येथील लोकनेते दि.बा. पाटील मैदान येथे से. १० ई; पिसार्वे व करवले गावाकडे जाणारा रस्ता या ठिकाणी; धानसर गाव व गावाकडे जाणारा रस्ता या ठिकाणी पथदीप खांब उभारून कार्यान्वित करणे हे विषय सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आले.

नवीन पनवेल येथील सेक्टर ८, भूखंड क्र.१२९ या उद्यानाची दुरूस्ती करणे या विषयास मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकरिता १०००० लिटर क्षमतेचे नवीन २० नग वॉटर टँकर वाहने खरेदी करणे हा विषय मंजूर करण्यात आला.

सन २०२६-२७ वर्षासाठी महापालिकेची नागरी आरोग्य केंद्रे, नागरी वर्धिनी केंद्रे येथे येणाऱ्या रुग्णांना औषधोपचार करण्याकरिता ई-निविदा प्रसिद्ध करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला. त्याचप्रमाणे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील महापालिका शालेय जिल्हास्तरीय विविध खेळांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यास अपेक्षित खर्चाला सर्वसाधारण सभेची मान्यता मिळण्याबाबतच्या विषयासही मंजुरी देण्यात आली.

# दिवाळी अंक पारितोषिक वितरण



















सौजन : अभिषेक पटवर्धन, अध्यक्ष : भाजपा (सां. सेल) - उ. रायगड जिल्हा





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com